## बिहारमधील ८ जिल्ह्यांत भूकंपाचे धक्के

■ वृत्तसंस्था, पाटना, दि. २८ :

शुक्रवारी पहाटे २:३७ वाजता बिहारमध्ये भूकंपाचा धक्का बसला. पाटणा, सुपौल, किशनगंज, मुझफ्फरपूर, समस्तीपूर, पूर्णिया, अररिया आणि कटिहार येथील लोकांना भूकंपाचे धक्के जाणवले.

भूकंपाचे धक्के सुमारे ५-१० सेकंदांपर्यंत जाणवले. लोक घराबाहेर पडले. काही लोक भांडी आणि शंख वाजवू लागले. भूकंपाचे केंद्र नेपाळमधील लिस्टीकोट होते. रिश्टर स्केलवर त्याची तीव्रता ५.१ होती. भूकंपाचा फटका नेपाळसह भारत आणि चीनलाही बसला. केंद्रस्थानी तीव्रता जास्त असल्याने, आणखी किरकोळ भूकंपाचे धक्के बसू शकतात, असा इशारा विभागाने दिला आहे. बिहारमध्ये कुठेही जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही.


नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २४६ * * अमरावती * शनिवार, दिनांक १ मार्च २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018



महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6


अग्राग्रलेख

## खरीखरी..

## शहांची दक्षिणेला दक्षिणा

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल तामिळनाडू किंवा दक्षिण भारताबाबत एक महत्त्वाचे विधान केलेले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दक्षिणेच्या मतदारसंघाची पुनर्रचना करताना ते कमी केले जाणार नाहीत. आता प्रश्न असा आहे की, मतदार संघाची पुनर्रचना करण्याचा अधिकार केंद्र सरकारला नाही. त्यासाठी पुनर्रचना आयोगाची नेमणूक करण्यात येते. त्याचे अध्यक्ष सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती असतात. हा आयोग स्वायत्त असतो. अर्थात असे घटनेत नमूद केलेले आहे. तसा आपला निवडणूक आयोगही स्वायत्तच आहे. इतर अनेक संस्था, आस्थापना आणि बरेचसे आयोग स्वायत्तच आहेत. त्याबरोबरच मतदार संघाची पुनर्रचना करणाऱ्या आयोगालाही स्वायत्तता असतेच. मतदारसंघ किती असावेत, कसे असावेत. त्याचा संपूर्ण अधिकार त्या आयोगाला असतो. पण ज्याअर्थी आपले केंद्रीय गृहमंत्री दक्षिणेच्या जागा कमी करणार नाही, असे म्हणतात. त्याअर्थी त्यांना नेमके काय सुचित करावयाचे आहे. हे जनतेला कसे समजेल. दक्षिणेतील द्रमुकचे व्ही. राजा यांनी वेगळाच प्रश्न उपस्थित केलेला आहे. दक्षिणेतील जागा कमी करणार नाही. हे जरी खरे असले तरी जेव्हा केव्हा हा आयोग स्थापन होईल. तेव्हा लोकसभेच्या जागा ज्या सध्या 544 आहेत. त्या जागांमध्ये किमान अडीचशे ते तीनशे जागा वाढलेल्या असतील. याचा सरळ अर्थ असा की दक्षिणेतील जागा आहेत, तशाच कायम असतील. तर उत्तरेतील प्रसवसंख्या (सोप्या भाषेत प्रजनन दरामुळे सातत्याने वाढलेली लोकसंख्या) जास्त असल्यामुळे तिकडील म्हणजेच उत्तरेतील जागा वाढतील किंवा वाढलेल्या असतील. म्हणजेच आत्ताच दक्षिणेच्या मतदारसंघाची संख्या कमी असली. तरी पुढील रचनेत त्याचे प्रमाण जास्त किंवा कमी होणार नाही. याची शाश्वती कोण देणार. दक्षिणेतील राज्यांनी कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम चांगल्या प्रकारे राबवल्यामुळे त्या राज्यात लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आणि समतोल साधलेला दिसतो. आता अशा गंभीर प्रश्नामुळे दक्षिण भारतात असंतोष माजणे स्वाभाविक आहे. अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार असताना 2001 सालामध्ये मतदार संघाच्या पुनर्रचनेची गरज होती. तरीही त्यावेळच्या सरकारने घटना दुरुस्ती करून पुढील 25 वर्ष हा प्रश्न तसाच कायम ठेवलेला होता. आता पुनर्रचना करताना लोकसंख्या हाच निकष धरला तर, उत्तरेकडील राज्ये दादागिरी करतील. मात्र, दक्षिणेकडील राज्य हे सहन करतील काय. तामिळनाडू सारखी राज्ये आता भारतीय संघराज्या बरोबर जोडलेली आहेत. तेथील फुटीरतावाद जवळजवळ संपुष्टात आलेला आहे. त्या राज्यांमध्ये हिंदीच्या आक्रमणाला विरोध आहे. परवा तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी हिंदीपेक्षा संस्कृत भाषेचा पगडा देशावर कसा बसेल. याविषयी एक सूचक विधान केलेले आहे. एकूणच हा विषय अत्यंत स्फोटक आहे. जनगणना करणे आवश्यक असले. तरी सरकारने याबाबतीत अजून कोणतीही हालचाल केलेली दिसत नाही. या जनगणने बरोबर जातीय जनगणना करायलाच पाहिजे. असा काँग्रेसचा आग्रह आहे. हे तरी शक्य होईल काय. एकूणच या सर्व बाबींचे गौडबंगाल सामान्य माणसांना समजेनासे झालेले आहे. अशा परिस्थितीमध्ये दक्षिण भारताला या सर्व गोष्टींचा तोटाच सहन करावा लागणार आहे, असे त्यांना वाटते. 2001 सालात 25 वर्षे पुनर्रचना न करण्याचा घेतलेला निर्णय पुढेही वाढू शकतो. म्हणजे आता या विषयाला किती फाटे फुटतात आणि हा विषय दक्षिण विरुद्ध उत्तर असा होऊ शकतो काय, याचाही गंभीरपणे विचार झाला पाहिजे. कोणत्याही स्थितीत भारताची एकात्मता टिकवायची असेल. तर दक्षिण भारताला झुकते माप देणे गरजेचे आहे. यामुळे मतदार संघ वाढले. तरी दक्षिण आणि उत्तरेतील मतदार संघाचे प्रमाण आणि त्यांचा समतोल कायम ठेवणे हा यावरील उपाय आहे. पण तसे करणे शक्य होईल की नाही. त्याचा विचार कोणत्याही सरकारला करावाच लागेल. ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


## सेन्सेक्समध्ये मोठी घसरण, बाजार कोसळला

# ७.५ लाख कोटी बुडाले

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :

आज, शुक्रवार २८ फेब्रुवारीला आठवड्यातील शेवटच्या ट्रेडिंग दिवशी सेन्सेक्स १४०० पेक्षा जास्त अंकांनी (१.५९%) घसरला आहे. तो ७३,२०० च्या पातळीवर व्यवहार करत आहे. निफ्टी देखील ४५० अंकांनी (१.६१%) घसरून २२,१५० च्या पातळीवर पोहोचला. बाजारातील घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे प्रचंड नुकसान झाले असून त्यांचे तब्बल ७.५ लाख कोटी रूपये बुडालेत.

सेन्सेक्सच्या ३० पैकी २७ शेअर्समध्ये घसरण झाली आहे आणि फक्त तीन शेअर्समध्ये तेजी आहे. निफ्टीच्या ५० समभागांपैकी ४५ खाली आहेत आणि फक्त ५ वर आहेत. आज एनएसईचे सर्व क्षेत्रीय निर्देशांक घसरणीला लागले आहेत. निफ्टी आयटी ३.२७%, ऑटो २.६५%, मीडिया २.५०%, सार्वजनिक क्षेत्रातील बँका २.०५% आणि मेटल १.८२% ने सर्वात जास्त तोटा सहन करावा लागला. याशिवाय, फार्मा, बँकिंग, एफएमसीजी आणि फायनान्शियल सर्व्हिसेस १% पर्यंत घसरले आहेत.

शेअर बाजार कोसळल्यामुळे गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ७.५ लाख कोटी रुपयांची घट झाली. शुक्रवार, २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता



बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ३८५ लाख कोटी रुपये होते. २७ फेब्रुवारी रोजी ते ३९३ लाख कोटी रुपये होते.

२७ फेब्रुवारी रोजी परदेशी गुंतवणूकदारांनी (एफआयआय) ५५६.५६ कोटी रुपयांचे शेअर्स विकले. २०२५ मध्ये, परदेशी गुंतवणूकदारांनी १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे भारतीय शेअर्स विकले आहेत. दरम्यान, या काळात म्युच्युअल फंडांसह देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांनी ८३,००० कोटी रुपयांचे शेअर्स खरेदी केले आहेत.

इतर काही देशातही सेन्सेंक्समध्ये घसरण नोंदविण्यात आली आहे . २७ फेब्रुवारी रोजी सेन्सेक्स १० अंकांच्या वाढीसह ७४,६१२ वर बंद झाला. निफ्टी २ अंकांनी घसरून २२,५४५ वर बंद झाला. सेन्सेक्सच्या ३० पैकी १३ शेअर्स घसरले आणि १६ शेअर्स वधारले. निफ्टीच्या ५० पैकी ३१ शेअर्समध्ये घसरण झाली तर १९ शेअर्समध्ये वाढ झाली. एनएसई क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये, मीडिया क्षेत्र सर्वाधिक ३.५८% आणि ऑटो क्षेत्र १.५१% ने घसरले. तर निफ्टी बँक, मेटल आणि फायनान्शियल सर्व्हिसेस निर्देशांक १% पर्यंत वाढले.

ऑक्टोबर २०२४ पासून, निफ्टी दर महिन्याला घसरणीसह बंद होत आहे. ५ महिन्यांत त्यात १२% घट झाली आहे. १९९६ नंतर पहिल्यांदाच सलग पाच महिने बाजारात घसरण झाली आहे.

यापूर्वी १९९६ मध्ये, जुलै ते नोव्हेंबर असे सलग ५ महिने बाजारात घसरण झाली होती. या ५महिन्यांत, निफ्टी ५० निर्देशांक २६% ने घसरला होता. ३० सप्टेंबर २०२४ रोजी बॉम्बे स्टॉक एक्सचेंज मध्ये सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप ४७४ लाख कोटी रुपये होते, जे २८ फेब्रुवारी रोजी ३८४ लाख कोटी रुपयांवर घसरले. ५ महिन्यांत गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ९० लाख कोटी रुपयांची घट झाली आहे.

## राज्य सरकारच्या ५०० सेवा आता व्हॉट्सअप वर

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २८ :

आशिया खंडातील सर्वात मोठा टेक्निकल इव्हेंट मुंबई टेक विकपार पडत आहे. त्यामुळे मुंबई ही तंत्रज्ञानाची राजधानी आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

इतकेच नाही तर आता राज्य सरकारच्या ५०० सर्व्हिसेस व्हॉट्सअप गव्हर्नन्सच्या माध्यमातून नागरिकांना मिळणार असल्याची घोषणा देखील त्यांनी केली. त्यासाठी राज्य सरकारने मेटा या कंपनीसोबत करार केला असल्याची माहिती त्यांनी दिली.

या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, मुंबई टेक इव्हेंट मध्ये आम्ही मेटा सोबत एक करार केला आहे. त्यानुसार आता राज्यातील अनेक सेवा या व्हॉट्सअप च्या माध्यमातून मिळू शकतील. मुंबई मेट्रोचे तिकीट जेव्हा आम्ही व्हॉट्सअप वर आणले त्यावेळी ५०% पेक्षा जास्त तिकीट व्हॉट्सअप वर निघाली, हे आमच्या लक्ष्यात आले. त्यामुळे आता राज्यातील सर्व सेवा आता व्हॉट्सअप च्या माध्यमातून आपल्याला मिळू शकतील, असा दावा त्यांनी केला.

फडणवीस म्हणाले की, आता गावातील शेवटचा माणूसही व्हॉट्सअपचा वापरतो आहे. त्यामुळे त्याला कुठेही ऑनलाइन जाण्याची आवश्यकता नाही. व्हॉट्सअपच्या माध्यमातून ५०० सरकारी सेवा तो प्राप्त करू शकतो.

एनपीसीआय यांनी युपीआय बनवले होते. त्याच एनपीसीआय कंपनीचे ग्लोबल हेडक्वार्टर आता मुंबईमध्ये तयार करण्यात येणार आहे. मुंबईकरता टेक्नॉलॉजी हब म्हणून ही मोठी घोषणा असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.



### सांभाळून बोला..

फडणवीस यांनी स्वारगेट बलात्कार प्रकरणात पीडितेने 'प्रतिकार' न केल्याच्या मुद्यावर बोट ठेवणाऱ्या गृह राज्यमंत्री योगेश कदम यांना संवेदनशिलतेने बोलण्याचा सल्ला दिला. अशा प्रकरणांत बोलताना संवेदनशीलता बाळगली पाहिजे. कारण, बोलताना चूक झाली तर त्याचा थेट समाजमनावर परिणाम होतो. त्यामुळे मंत्री असो की लोकप्रतिनिधी सर्वांनी संवेदनशीलतेने बोलले पाहिजे, असा माझा सल्ला आहे, असे फडणवीस म्हणाले.

## उत्तराखंडमध्ये हिमस्खलन

# ५७ मजूर दबले



■ वृत्तसंस्था, डेहराडून, दि. २८ :

उत्तराखंडमधील चमोली येथे शुक्रवारी सकाळी ७.१५ वाजता हिमस्खलनामुळे ५७ कामगार बर्फाखाली गाडले गेले. कामगार ८ कंटेनर आणि एका शेडमध्ये होते. बद्रीनाथला लागून असलेल्या चमोलीच्या माना गावात ही घटना घडली. येथे बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनची टीम चमोली-बद्रीनाथ महामार्गावरील बर्फ हटवण्याचे काम करत आहे.

घटनेची माहिती मिळताच, आयबेक्स ब्रिगेडचे १०० हून अधिक जवान तातडीने बचाव कार्यात सहभागी झाले. यामध्ये डॉक्टर आणि रुग्णवाहिका कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. सकाळी ११.५० वाजता, पथकाने पाच कंटेनर शोधले आणि १० कामगारांना वाचवले. या लोकांना जोशीमठ आणि माना येथील रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. १० पैकी ४ जणांची प्रकृती गंभीर आहे. उर्वरित ३ कंटेनरचा शोध सुरू आहे.

आतापर्यंत एकूण १६ कामगारांना वाचवण्यात आले आहे. ४१ जणांचा शोध सुरूच आहे. लष्कराव्यतिरिक्त, एनडीआरएफ, एसडीआरएफ, आयटीबीपी आणि बीआरओच्या तुकड्या घटनास्थळी उपस्थित आहेत. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी अपघाताबाबत राज्य आपत्ती नियंत्रण कक्षाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली आहे.

## तुहिन कांत पांडे हे सेबीचे नवे प्रमुख

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २८ :

केंद्र सरकारने वित्त सचिव तुहिन कांत पांडे यांची भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड (सेबी) चे पुढील प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे.



तुहिन पुढील ३ वर्षांसाठी हे पद भूषवतील. ते सध्याच्या प्रमुख माधवी पुरी बुच यांची जागा घेतील. माधबी आज २८ फेब्रुवारी रोजी निवृत्त झाल्या आहेत.






## स्वारगेट प्रकरण : आरोपीचा आत्महत्येचा प्रयत्न

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २८ :



पुण्याच्या स्वारगेट बसस्थानकावर उभ्या शिवशाही बसमध्ये तरुणीवर बलात्कार करणाऱ्या आरोपीने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केल्याची बाब समोर आली आहे. आरोपीच्या प्राथमिक वैद्यकीय तपासणीत त्याच्या गळ्यावर दोरीचे व्रण (वळ) आढळून आलेत.

पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी त्याची पुष्टी केली आहे. यामुळे अटक केल्यानंतर त्याच्यावर करडी नजर ठेवली जात आहे. दरम्यान, आरोपीने पीडित तरुणीशी सहमतीने संबंध झाल्याचा दावा केल्याचीही माहिती आहे.

पोलिसांनी या प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे याला गुरुवारी मध्यरात्री शिरुर तालुक्यातील गुनाट गावातून अटक केली आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, स्वारगेट बसस्थानकातील २३ सीसीटीव्ही कॅमेरे व स्थानकाबाहेरील ४८ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासल्यानंतर अवघ्या दीड-दोन तासांतच पोलिसांनी आरोपीची ओळख पटवली. अखेर आज त्याच्या मुसक्या आवळण्यात यश आले. आम्ही गावाला भेट देऊन तेथील नागरिकांचा सत्कार करणार आहोत.

दत्तात्रय गाडे गेल्या दोन दिवसापासून शिरूर तालुक्यातील गुनाट गावातील उसात लपून बसला होता. भूक लागल्याने रात्री तो गावातील एका नातेवाईकांच्या घरी गेला. नातेवाइकांनी त्याला खायला आणि पाण्याची बाटली दिली. त्याचवेळी दत्तात्रय गाडेने आपल्याला पश्चात्ताप झाला आहे, असे नातेवाईकांना सांगितले. मला पोलिसांना सरेंडर व्हायचंय, असे देखील तो म्हणाला. त्यानंतर पाण्याची बाटली घेऊन तो निघून गेला. त्याचवेळी नातेवाइकांनी पोलिसांना गाडे आल्याची माहिती दिली आणि त्यानंतर तो पोलिसांना सापडला.

आरोपी दत्तात्रय गाडेला पुणे कोर्टात हजर करण्यात आले. यावेळी दोन्ही बाजुची सुनावणी पार पडली व न्यायाधीश टी.एस. गायगोले यांनी आरोपीला १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. सरकारी वकिलांनी आरोपीवरील गुन्ह्यांची माहिती कोर्टात दिली

## हा तर जिझिया कर...

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २८ :



भारतीय जनता पक्षाचे सरकार जनतेची लूट करण्याची एकही संधी सोडत नाही. जनता आधीच महागाईने त्रस्त असताना आता वाहनधारकांच्या खिशावर सरकारची नजर पडली आहे. वाहनांच्या हाय सेक्युरिटी नंबर प्लेटच्या नावाखाली भरमसाठ शुल्क आकारले जात आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील दर दुपटीपेक्षा जास्त असून हे शुल्क नाही तर जिझिया करच आहे असा आरोप प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

हर्षवर्धन सपकाळ यांनी यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी केलेल्या वाहनांसाठी हाय सेक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट बंधनकारक करण्यात आली आहे. या उपक्रमाचा हेतू चांगला वाटत असला तरी या आडून राज्यातील वाहनधारकांची खुलेआम लूट सुरु आहे.

## योगेश कदमांची हकालपट्टी करा!

■ महासागर प्रतिनिधी अकोला, दि. २८ :

महाराष्ट्रातील राजकीय व्यवस्था ही लकवा मारल्यासारखी झाली आहे. पुण्यातील घटना यावर राज्य गृहमंत्री योगेश कदम यांचे स्टेटमेंट असंवेदनशील आहे. त्यातून त्यांची मानसिकता दिसून येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योगेश कदम सारख्या मंत्र्यांना मंत्रिमंडळात का ठेवावं असे म्हणत त्यांचे मंत्रीपद काढून घ्यावे, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. ते अकोला येथील पत्रकार परिषदेत बोलत होते.

ॲड. आंबेडकर यांनी म्हटले की, योगेश कदम यांनी स्वारगेट अत्याचार प्रकरणी असंवेदनशील वक्तव्य केले, ते दुर्दैवी आहे. अशा घटनेवर सामान्य जनता शोक व्यक्त करते, दिलगिरी व्यक्त करते. परंतु मंत्री पदावर बसलेली व्यक्ती अशा पद्धतीने वक्तव्य करते.

त्यातून पोलिसांना आणि आरोपींना सुद्धा बळ मिळते. अशा मंत्र्यांना मंत्रिमंडळात का ठेवावं, हा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःला विचारायला हवा, असही ॲड. प्रकाश आंबेडकर यावेळी म्हणाले.

# मंत्रालयातील मुख्यमंत्री कार्यालय उडवून देऊ

### पाकिस्तानी नंबरवरुन मुंबई पोलिसांना मेसेज



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. २८ :** मंत्रालयातील मुख्यमंत्री कार्यालय उडवून देण्याच्या धमकीचा मेसेज मुंबई पोलिसांच्या वरळी वाहतुक शाखेला आला.पाकिस्तानी नंबरवरुन हा व्हाट्सप मॅसेज पोलिसांना बुधवारी आला होता. वरळी पोलिसांकडून याबाबत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी तपास सुरु केला आहे.

दरम्यान धमकीचा मेसेज करणाऱ्या व्यक्तीने आपले नाव शहाबाज हुमायून राजा देव असल्याचे सांगितले आहे. मेसेज करणारी व्यक्ती ही भारतातील की बाहेरील याचा शोध हा पोलिसांकडून घेतला जात आहे. मुंबई वाहतूक पोलिसांना हा मेसेज केल्याची माहिती आहे.

### काही दिवसांपासून धमकी सत्र सुरू

आम्ही मुख्यमंत्री कार्यालयावर मोठ्या प्रमाणात हल्ला करू. हा मेसेज व्हाट्सअपच्या माध्यमातून पाठवण्यात आला असून त्यानंतर पोलिस यंत्रणा या अलर्ट मोडवर आहेत. आता या धमकी प्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. गेली काही दिवस धमकी देण्याचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची गाडी बॉम्बने उडून देण्याची धमकी देण्यात अी होती. या प्रकरणात आरोपीने मित्राचा बदला घेण्यासाठी अशाप्रकारे धमकी पाठवल्याचे स्पष्ट झाले होते. तर भाजप आमदार श्वेता महाले यांनाही जीवे मारण्याची धमकी देण्यात आली.

### एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याची धमकी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. यासंदर्भात गोरेगाव पोलिस ठाण्यात धमकीचा ईमेल करण्यात आला आहे. शिंदे यांची गाडी बॉम्बने उडवण्याचा उल्लेख यामध्ये करण्यात आला. या प्रकरणात आरोपीने मित्राचा बदला घेण्यासाठी अशाप्रकारे धमकी पाठवल्याचे स्पष्ट झाले होते.

### भाजपच्या आमदार श्वेता महालेंना जीवे मारण्याची धमकी

बुलढाण्यातील चिखलीच्या भाजपा आमदार श्वेता महाले यांना पत्राद्वारे जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. श्वेता महाले यांच्या चिखली येथील निवासस्थानी हे धमकीचे पत्र मिळाले. या पत्रात म्हटलंय की, कितीजरी सुरक्षा असली तरी तुकडे तुकडे करू. जिवंत ठेवणार नाही तुमची सुरक्षा काहीच कामात येणार नाही. इंदिरा गांधी या पंतप्रधान असताना सुरक्षा कामी आली नाही तू केवळ आमदार आहेस तुझी सुरक्षा तूला वाचवू शकणार नाही.

# मंत्री सावकारे, योगेश कदम यांना घरचा आहेर

### शिवसेनेतील बड्या नेत्याने सुनावले



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. २८ :** अत्याचारापेक्षा कुठलीही मुलगी स्वतःचा जीव वाचवण्यासाठी प्राधान्य देणार हे निश्चित आहे. त्यामुळे तिने त्या ठिकाणी आरडाओरड केली नसेल. मंत्री योगेश कदम यांचे वक्तव्य बालिशपणाचे आहे. पण या प्रकरणात ते आरोपीला फाशीची शिक्षा देण्यासाठी प्रयत्न करतील.

**: मंत्री सावकारे, योगेश कदम यांना घरचा आहेर, शिवसेनेतील या बड्या नेत्याने सुनावले.**

पुणे येथील स्वारगेट बसस्थानकावर २५ फेब्रुवारी रोजी एका २६ वर्षीय तरुणीवर अत्याचार झाला. यानंतर राज्यभरात संतापाचा उद्रेक झाला आहे. परंतु त्याचवेळी सत्ताधारी मंत्र्यांकडून वादग्रस्त विधाने केली जात आहे. गृहराज्यमंत्री व शिवसेनेचे आमदार योगेश कदम यांनी पीडित तरुणी ओरडली का नाही? असा प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर आता भाजपचे नेते व वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी वादग्रस्त विधान केले आहे. देशात अशा घटना घडत असतात. कारवाई सातत्याने चालूच असते, असे सावकारे यांनी म्हटले होते. त्यावर शिवसेना नेते व माजी आमदार शहाजी बापूपाटील यांनी दोन्ही मंत्र्यांना घरचा आहेर दिला आहे. त्यांना चार खडे बोल सुनावले आहे. शहाजी बापू पाटील म्हणाले, मंत्री संजय सावकारे यांचे विधान आश्चर्यकारक आणि धक्कादायक आहे. कोणतीही महिला ही कोणाचीतरी माता आहे. बहीण अन् मुलगी आहे. या सृष्टीची तारणहार तीच आहे. सर्व महिलांविषयी सर्वांनी आदर बाळगला पाहिजे, असे विधान करणे गैर असल्याचे मत शहाजी बापू पाटील यांनी व्यक्त केले.

### योगेश कदम यांचे विधान आश्चर्यकारक

मंत्री योगेश कदम यांचे विधान आश्चर्यकारक आहे. परंतु योगेश कदम हे तरुण मंत्री आहेत. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते बोलले असतील. परंतु घटनास्थळी काहीच दंगा झाला नाही, असे म्हणण्यापेक्षा त्या मुलीवर आरोपीने प्रचंड दबाव टाकून अत्याचार केला असेल, हे समजणे गरजेचे आहे. अत्याचारापेक्षा कुठलीही मुलगी स्वतःचा जीव वाचवण्यासाठी प्राधान्य देणार हे निश्चित आहे. त्यामुळे तिने त्या ठिकाणी आरडाओरड केली नसेल. मंत्री योगेश कदम यांचे वक्तव्य बालिशपणाचे आहे. पण या प्रकरणात ते आरोपीला फाशीची शिक्षा देण्यासाठी प्रयत्न करतील, असा मला विश्वास आहे, असे शहाजी बापू पाटील यांनी म्हटले आहे.

# उद्धव ठाकरे हिंदुत्ववादी ढोंगी : आशिष शेलारांची टीका



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. २८ :** उद्धव ठाकरे हे सभेत दाखवण्यापूरती हातात रुद्राक्षाची माळ घेतात, त्यांच्या तोंडात कायम औरंगजेबाचा जप सुरू असतो, असा आरोप करत मंत्री आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरे यांना हिंदुत्ववादी ढोंगी, असे देखील म्हटले आहे. महाराष्ट्रात ढोंगी हिंदुत्ववादी सोडले तर जगभरातील कोट्यावधी भाविक कुंभमेळ्यात पवित्र स्नान करून आले, असा आरोप देखील त्यांनी केला आहे.

या संदर्भात भारतीय जनता पक्षाचे मंत्री आशिष शेलार यांनी एका पोस्टच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांच्यावर हिंदुत्व वादाच्या मुद्द्यावरून जोरदार निशाणा साधला. आयोध्येत प्रभू रामाचे भव्य मंदिर उभे राहिले. महाराष्ट्रातील ढोंगी हिंदुत्ववादी सोडले तर जगभरातील कोट्यावधी लोकांनी तेथे दर्शन घेऊन आले असल्याचे शेलार यांनी म्हटले आहे.

इतकेच नाही तर आमच्या छत्रपती संभाजी महाराजांवरील छावा सिनेमाला मात्र महाराष्ट्रातील ढोंगी हिंदुत्ववादी सोडले तर जगभरातील कोट्यावधी लोकांनी तो पाहिला असल्याचे शेलार यांनी म्हटले आहे.

# अल्पवयीन मुलीवर वारंवार अत्याचार

### भाजप महिला पदाधिकाऱ्याच्या मुलाचे कृत्य

■ **महासागर प्रतिनिधी,**
**रायगड , दि. २८ :** राज्यात महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. पुणे, मुंबई, परभणीमधील घटना समोर आसल्यानंतर असाच धक्कादायक प्रकार रायगडमधून समोर आला आहे. भाजपच्या स्थानिक महिल्या नेत्या असणाऱ्या महिलेच्या मुलाने एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार म्हात्रे नामक मुलाची आणि पीडित अल्पवयीन मुलीची सोशल मिडीयावर ओळख झाली. यातून लग्नाचे आमिष दाखवत त्यांने तिच्यावर अत्याचार करत चित्रीकरण केले.

व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत तब्बल महिने त्याने मुलीचे लचके तोडल्याचा संतापजनक प्रकार घडला आहे. मनिष म्हात्रे असे आरोपी तरुणाचे नाव आहे.



### नेमकी घटना काय ?

पीडितमुलगी आणि मनिष यांची स्नॅपचॅटवरून मे २०२४ मध्ये ओळख झाली. ऑगस्ट २०२४ मध्ये मनिष याने पीडितमुलीला तु मला आवडतेस मला तुझ्यासोबत लग्न करायचे आहे असे म्हणत प्रेमाच्या जाळ्यात ओढले. यानंतर एक दिवस आपल्या चिंचपाडा येथील श्री शिवाली गृहनिर्माण संस्था येथील घरी बोलावून तिच्यावर अत्याचार केला, आणि या घटनेचे चित्रीकरण केले. तु कोणाला सांगितलास तर तुझा व्हिडिओ व्हायलर करीन अशी धमकी दिली. देत त्यांने ६ महिने तिच्यावर अत्याचार केला. त्यावर ते एकमेकांशी बोलू लागले. . असं बोलून त्याने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. नंतर सायन्स विषयाच्या नोटस वरुन ते साई मंदिर पेण येथे भेटले. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात मनिष याने आपल्या तिच्या इच्छेविरुध्द तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर तिला,

### पोक्सोनुसार गुन्हा दाखल

रायगड जिल्हा भाजपा महिला सरचिटणीस वंदना म्हात्रे यांचा मुलगा मनिष याने एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर गेली ६ महिने व्हिडिओव्हायरल करण्याची धमकी देत अत्याचार केल्याची माहिती समोर आली आहे. त्याच्यावर पेण पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ६४(२) (१), ६४(२) (एम) तसेच बालकाचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२, ४,६,८ (पोक्सो) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चौकशीतून सर्व निष्पन्न होईल, अजित पवारांचा दावा

### संजय राऊतांसह मीडियाला सल्ला

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नांदेड , दि. २८ :** पुण्यातील घटनेचा सर्वांनीच निषेध केला आहे. आरोपी आता ताब्यात आला असून त्याच्या चौकशीतून सर्व गोष्टी निष्पन्न होतील, असा दावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला आहे. यावेळी त्यांनी संजय राऊत यांना देखील प्रत्युत्तर दिले आहे. जो व्यक्ती रोज सकाळी काहीतरी बोलत असतो, त्या सर्वांना उत्तर देण्यास आम्ही बांधील नाही. त्यांचे काही आरोप असतील तर त्यांनी ते पोलिसांकडे द्यावेत, पोलिस त्याची चौकशी करतील, असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे. अजित पवार हे नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून या संदर्भात त्यांनी नांदेड येथे प्रसार माध्यमांशी संवाद साधला.



एखादी घटना घडल्यानंतर मीडियाने ती कशाप्रकारे लोकांसमोर मांडावी, हा मीडियाचा अधिकार आहे. पुणे येथील घडलेल्या घटनेचा सर्वांनीच निषेध केलेला आहे. ही माणुसकीला काळीमा फासणारी घटना आहे. त्या नराधमाला ताबडतोब अटक झाली पाहिजे यासाठी सर्वजण प्रयत्न करत होते. रात्री एक वाजता त्याला अटक झालेली आहे. पोलिसांच्या ताब्यात तो आलेला असून त्याची चौकशी सुरू झाली आहे. आज त्याला न्यायालयात हजर केले जाणार आहे. त्यातून काय वस्तुस्थिती आहे ते सर्व निष्पन्न होईल, असा दावा अजित पवार यांनी केला आहे.

या संदर्भात सकाळी पोलिस आयुक्तांशी बोलणे झाले आहे. त्याला एक वाजता ताब्यात घेण्यात आले असल्याचे त्यांनी मला सांगितले. तसेच त्याची चौकशी सुरू असल्याचेही त्यांनी मला सांगितले आहे. असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे. या संदर्भातल्या बातम्या विकृत व्यक्ती देखील पाहत असते. त्यामुळे आपण कशा पद्धतीने बातम्या कराव्यात? याचा निर्णय घेत माध्यमांनी विचार करायला हवा. थोडे तारतम्य सर्वांनीच ठेवायला हवे. राजकीय लोकांनी आणि मीडियाने देखील तसे तारतम्य ठेवायला हवे, असा सल्ला देखील अजित पवार यांनी दिला आहे. आरोपीला पकडण्याच्या बातम्या करताना या बातम्यांचा उपयोग त्याला स्वतःला लपवण्यासाठी होता कामा नये, याची काळजी घ्यायला हवी, असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे.

### संजय राऊत यांना टोला

ज्या व्यक्तीचे नाव तुम्ही घेत आहात, तो रोज सकाळी नऊ का दहा वाजता बोलत असतो. त्यांच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्यास आम्ही बांधील नाही.

त्यांनी केलेल्या आरोप संदर्भात काही तक्रार असेल तर त्यांनी नावानिशी तक्रार दिली तर पोलिस त्याची चौकशी करतील, असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे.

# पोलीस ठाण्यात कर्मचाऱ्याने स्वतःवर ओतले पट्रोल




**पुणे :** पुण्यातील गुन्हेगारी दिवसेंदिवस वाढत असतानाच, आता एका पोलिस कर्मचाऱ्याने विश्रांतवाडी पोलिस ठाण्याचे आवारात स्वत:चे बुलेट गाडीतील पेट्रोल एका कॅन मध्ये काढून आणत, स्वत:चे अंगावर ओतून घेत आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा प्रकार घडल्याने गोंधळ उडाल्याचा प्रकार घडला. याप्रकरणी पोलिस शिपाई विजय लक्ष्मण जाधव याच्यावर वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी गैरवर्तन केल्याबद्दलचा ठपका ठेवत त्याचेवर निलंबन कारवाई केली आहे.

याप्रकरणी विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांचा नियंत्रण कक्ष असलेल्या डायल ११वर धानोरी परिसरात सहयाद्री कॉलनी येथे भांडणे झाल्याचा फोन आला होता. त्यानुसार विश्रांतवाडी पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक एस माने हे घटनास्थळी गेले होते. त्यावेळी सदर ठिकाणी पोलिस मुख्यालयात नेमणुकीस असलेले पोलिस शिपाई विजय जाधव व त्यांचा भाऊ विकी लक्ष्मण जाधव व इतर असे सर्वजण ओंकार गुलचंद सिंग हे राहते घराचे परिसरात व्यवसाय करत असलेल्या डुकरे पाळण्याच्या हद्दीवरुन त्यांच्यात वाद सुरु होते. त्यावरुन सदर दोन्ही बाजूच्या लोकांना विश्रांतवाडी पोलीस स्टेशन येथे आणण्यात आले. त्यावेळी पोलिस स्टेशन मध्ये याबाबत चौकशी केली जात असताना पोलिस कर्मचारी विजय जाधव याने पोलिस स्टेशनचे बाहेर जाऊन स्वत:चे बुलेट गाडीतील पेट्रोल एका कॅन मध्ये आणले व स्वत:चे अंगावर ते टाकून आरडाओरड सुरु केल्याने गडबड उडाली. यावेळी पोलीस स्टेशन मध्ये हजर असलेल्या अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी तात्काळ त्यास ताब्यात घेत यासंदर्भातील माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना दिली. चौकशी दरम्यान पोलीस शिपाई विजय जाधव याने गैरवर्तन केल्याचे सिध्द झाल्याने त्याचेवर निलंबन कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव यांनी दिली आहे. याबाबत पुढील तपास विश्रांतवाडी पोलीस करत आहे.

# तिन गुन्हे, आठ आरोपी आणि १८०० पानांचे आरोपपत्र

### संतोष देशमुख हत्या प्रकरण

■ **महासागर प्रतिनिधी,**
**बीड , दि. २८ :** सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातसी आयडी व एसआयटीने गुरुवारी दोषारोपपत्र बीडच्या विशेष मकोका न्यायालयात दाखल केले. आरोपींनी आधी खंडणी मागितली, त्यातूनच सुरक्षा रक्षकाला मारहाण झाली. नंतर संतोष देशमुख यांचा खून झाला, अशी मांडणी सीआयडीने दोषारोपपत्रात केली आहे. त्यामुळे या प्रकरणात दाखल तिन्ही गुन्ह्यांचे वेगवेगळे दोषारोपपत्र न करता, वाल्मीकसह ८ जणांविरोधात एकच दोषारोपत्र दाखल केले.सरपंच देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण करुन हत्या झाली होती. त्यानंतर राज्यात अनेक ठिकाणी मोर्चे निघाले होते. या प्रकरणात तीन वेगवेगळे गुन्हा नोंद झाले होते. सुरुवातीला केज पोलिस वत्यानंतर सीआयडी, एसआयटीकडे तपास गेला होता.

### तीन गुन्ह्यांची लिंक अशी

२९ नोव्हेंबर २०२४ रोजी वाल्मीकने आवादा कंपनीला २ कोटींची खंडणी विष्णू चाटेच्या मोबाईल वरुन मागितली होती. त्याच्या वसूलीची जबाबदारी चाटेसह सुदर्शन घुले व सहकाऱ्यांकडे दिली होती. यातूनच ६ डिसेंबर २०२४ रोजी सुदर्शन घुले हा सहकाऱ्यांसह मस्साजोगला कंपनीच्या कार्यालयात गेला.



तिथे सुरक्षा रक्षकाला मारहाण केली. सुरक्षा रक्षकाने बोलावल्याने सरपंच संतोष देशमुख तिथे गेले. त्यांच्यात व घुले मध्ये वाद झाला. या प्रकरणात घुले विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला. या रागातून घुले याने ९ डिसेंबरला अपहरण करुन देशमुख यांची हत्या केली.अशी मांडणी सीआयडीने केली आहे.

उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्तीया प्रकरणात राज्य सरकारच्या वतीने विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः याबाबतची माहिती दिली. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची मागणी केली होती.

संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांनी आपल्या विविध मागण्यासाठी मस्साजोग येथे ग्रामस्थांसोबत अन्नत्याग आंदोलन सुरू केले होते. ग्रामस्थांच्या मागण्यांमधील प्रमुख मागण्यांमध्ये उज्ज्वल निकम यांची सरकारी वकिल म्हणून नियुक्ती करण्याची मागणी होती. त्यानुसार आता राज्य सरकारच्या वतीने ही मागणी मान्य करण्यात आली आहे. या संबंधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक पोस्ट शेअर केली आहे.

# सरकारच्या हस्तक्षेपामुळे मिळाला अमेरिकेचा व्हिसा

### साताऱ्याच्या नीलम शिंदेचा कॅलिफोर्नियामध्ये अपघात

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. २८ :** अमेरिकेने भारतीय विद्यार्थिनी नीलम शिंदेच्या कुटुंबाला आपत्कालीन व्हिसा मंजूर केला आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या हस्तक्षेपानंतर हे शक्य झाले. तिच्या वडिलांनी परराष्ट्र मंत्रालयाकडे आपत्कालीन व्हिसासाठी अर्ज केला होता. १४ फेब्रुवारी रोजी कॅलिफोर्नियामध्ये नीलम शिंदे (३५) यांना कारने धडक दिली. यानंतर त्या कोमात गेल्या. आरोपी चालकाला पोलिसांनी अटक केली आहे. नीलम या महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील रहिवासी आहेत. ४ वर्षांपासून अमेरिकेत राहत आहेत.

कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, नीलम आयसीयूमध्ये दाखल आहेत. त्यांच्या हाताला आणि पायाला फ्रॅक्चर झाले आहे. डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. रुग्णालय व्यवस्थापनाने मेंदूच्या शस्त्रक्रियेसाठी कुटुंबीयांकडून परवानगी मागितली आहे. नीलमची काळजी घेण्यासाठी कुटुंबाचे तेथे असणे महत्त्वाचे आहे.



नीलमच्या वडिलांनी अमेरिकन दूतावासाकडून आपत्कालीन व्हिसा मागितला होता. दूतावासाने आज सकाळी ९ वाजता मुलाखतीसाठी बोलावले होते. वडील तानाजी शिंदे यांनी सांगितले की, त्यांना या अपघाताची माहिती १६ फेब्रुवारी रोजी मिळाली.

नीलम १४ फेब्रुवारी रोजी अपघाताची बळी ठरल्या. त्यांच्या रूममेट्सनी २ दिवसांनी कुटुंबाला याबद्दल माहिती दिली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे मदतीसाठी पुढे आल्या

शिंदे कुटुंब व्हिसा अर्जासाठी स्लॉट बुक करत होते, पण त्यांना पुढच्या वर्षीच्या तारखा मिळत होत्या. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) खासदार सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियावर हा मुद्दा उपस्थित केला आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांना मदतीचे आवाहनही केले.

अमेरिकेत आपत्कालीन व्हिसा मिळविण्यासाठी किती वेळ लागतो?

कुटुंबातील सदस्याचा मृत्यू, गंभीर आजारांवर उपचार किंवा मानवीय संकट अशा परिस्थितीत अमेरिका इतर देशांच्या नागरिकांना आपत्कालीन व्हिसा जारी करते. अर्ज करण्यापासून ते व्हिसा जारी करण्यापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेला २ ते ५ दिवस लागू शकतात.

सहसा काही दिवसांतच आपत्कालीन व्हिसाची अपॉइंटमेंट मिळू शकते. जर मंजूर झाला तर तो २४ ते ४८ तासांच्या आत जारी केला जाऊ शकतो.

# फास्टट्रॅक न्यायालयात खटला चालवणार



■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे , दि. २८ :** स्वारगेट एसटी स्थानक परिसरात २६ वर्षीय तरुणीवर शिवशाही बसमध्ये झालेल्या बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्ता गाडे याला पुणे पोलिसांनी शिरूर परिसरात गुनाट गावच्या हद्दीतून शुक्रवारी रात्री अटक केली आहे. या कारवाईत सुमारे ५०० पोलिस कर्मचारी मागील तीन दिवस काम करत होते . त्यासोबत गावातील ४०० ग्रामस्थ यांचे सहकार्य मिळाले. श्वान पथकाने ऊस शेतातील जागा दाखवल्या होत्या तसेच ड्रोन मदत घेण्यात आली. आरोपीला न्यायालयात हजर करून पुढील तपास करण्यात येईल. या प्रकरणात विशेष सरकारी वकील यांची नियुक्ती करून फास्ट ट्रॅक न्यायालयात केस चालवण्यात येईल अशी माहिती पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली. अमितेश कुमार म्हणाले की, शहरातही महिला सुरक्षा आढावा घेण्यात आला आहे. शहरातील विविध भागातील सेफ्टी ऑडिट घेतले जात आहे. मनपा सोबत एकदा पुन्हा डार्क स्पॉट जागी लाईट खांब लावून गस्त वाढविण्यात येईल. महिला सुरक्षा बाबत सुरक्षित वातावरण निर्माण करण्यात येईल.

# विद्यापीठांमध्ये अध्यापक भरतीसाठी नवी पद्धत

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे , दि. २८ :** राज्यातील अकृषी विद्यापीठांमधील अध्यापक पदांच्या भरती प्रक्रियेस मान्यता देण्यात येत आहे. निवड प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि निष्पक्षता येण्यासाठी यापुढे राज्यात अध्यापक पदांची भरती प्रक्रियेसाठी नवीन कार्यपद्धतीचा अवलंब होणार आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले , राज्यपाल आणि कुलपती यांच्या मार्गदर्शनानुसार राज्यातील विद्यापीठांमध्ये सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांच्या निवड प्रक्रियेसाठी गुणांकन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये शैक्षणिक क्रेडेन्शियल आणि त्यांची मुलाखतीमधील कामगिरी गृहीत धरण्यात येणार आहे. या दोन्ही बाबी एकत्रित करून अधिक पारदर्शक, निष्पक्ष निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि अध्यापनाला ४० टक्के गुण तर मुलाखतीसाठी २०टक्के गुण देण्यात येणार आहे. एकत्रित १०० गुणांपैकी किमान ५० टक्के गुण मिळवलेल्या उमेदवारांनाच अंतिम निवडीसाठी पात्र असतील. अध्यापन क्षमता अथवा संशोधन प्राविण्य यांचे मुल्यमापन परिसंवाद अथवा व्याख्यान प्रात्यक्षिक अथवा अध्यापन आणि संशोधन यामधील नवीनतम तंत्रज्ञान वापरण्याच्या क्षमतेवरील चर्चा या बाबी मुलाखतीच्या टप्प्यावर विचारात घेण्यात येतील. निवड समितीच्या बैठकांचे दृक-श्राव्य चित्रिकरण करण्यात येणार आहे. निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दृक-श्राव्य चित्रिकरण,बैठकीला उपस्थित असलेल्या निवड समितीच्या सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीने सीलबंद करण्यात येईल. मुलाखती पूर्ण होताच त्याच दिवशी अथवा दुसऱ्या दिवशी निकाल जाहीर करण्यात येईल. ही सर्व निवड प्रकिया सहायक प्राध्यापक पदासह सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांच्या निवड प्रक्रियेसाठी लागू राहील. नवीन निवडप्रक्रियेच्या अधीन राहून विद्यापीठांमधील सध्या सुरू असलेली अध्यापकांची निवड प्रक्रिया पूर्ण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच भविष्यात होणाऱ्या विद्यापीठांमधील अध्यापकांच्या निवड प्रक्रियेकरिता याच कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. यामुळे विद्यापीठांमध्ये पारदर्शक आणि जलद निवड प्रक्रिया राबविणे शक्य होणार आहे. या सुधारित कार्यपद्धतीमुळे गुणवत्ताधिष्ठित अध्यपकांची निवड होईल. तसेच उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.



### अलिबाग लगतच्या समुद्रात मच्छिमार बोटीला आग

**मुंबई :** अलिबाग लगतच्या अरबी समुद्रात मच्छिमार बोटीला आग लागल्याची घटना घडली आहे. या घटनेत ही बोट पूर्णतः भस्मसात झाली आहे. या बोटीवर १८ ते २० खलाशी होते. त्यांना कोस्ट कार्ड व नौदलाच्या मदतीने वाचवण्यात आले. यासंबंधीच्या वृत्तानुसार, दुर्घटनाग्रस्त बोट साखर आक्षी गावातील राकेश मारुती गण यांच्या मालकीची आहे. या बोटीला शुक्रवारी पहाटे ३-४च्या सुमारास अचानक समुद्र किनाऱ्यापासून ६-७ नॉटिकल अंतरावर आग लागली. आग नेमकी कशामुळे लागली? हे अद्याप स्पष्ट झाले नाही.

# व्याजाची रक्कम समायोजित करण्याचा निर्णय

**व्याजाचा परतावा करण्याच्या शहर काँग्रेस पक्षाच्या मागणीला यश | मालमत्ता कराचे व्याज भरलेल्या नागरिकांना दिलासा**





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.28)**– अमरावती महानगरपालिकेने शहरातील नागरिकांवर मालमत्ता कर 2 टक्के व्याजाने लागू केला होता. त्या मालमत्ता वरील व्याज माफ करण्याचा संदर्भातील निर्णय महानगरपालिकेने काही दिवसांआधी घेतला होता. परंतु यानिर्णयामध्ये शहरातील ज्या नागरिकांनी व्याजा सकट मालमत्ता कर भरलेला आहे, त्यांच्या संदर्भात कोणताही धोरणात्मक निर्णय अमरावती महानगरपालिकेने घेतला नव्हता. म्हणुन अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने आज शुक्रवार दिनांक 28 फेब्रुवारी 2025 रोजी निषेध आंदोलन करण्याचा महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन दिल्यानंतर आंदोलनापुर्वीच दि.27 च्या पूर्वसंध्येलाच महानगरपालिकेने पुढे येत ज्यांनी व्याज भरलेले आहे त्यांचे व्याज पुढील वर्षाच्या मालमत्ता करात समायोजित करू अश्या प्रकारची भूमिका घेतली.

वास्तवात ज्यादिवशी व्याजमाफिचा निर्णय झाला होता त्याच दिवशी सदर निर्णयामध्ये ज्यांनी व्याजाचा भरणा केलेला आहे त्याबाबतचां निर्णय घेणे अपेक्षित होते. परंतु नागरिकांकडून व्याजाच्या स्वरूपात भरलेला कोट्यवधी रुपयांचा पैसा हडपण्याचे महानगरपालिकेचे कारस्थान होते त्याच्यावरती आज काँग्रेस पक्षाने प्रहार केला आणि शेवटी काल याबाबतचा निर्णय घ्यावा लागला. तथापि याही बाबतीत आज काँग्रेसने आज अत्यंत आक्रमकपणे शहरातील ज्या नागरिकांकडून महापालिकेने व्याज घेतलेले आहे त्यांचा व्याजाचा परतावा 24 तासांमध्ये सुरू करा अशी मागणी केली आणि जर परतावा करणार नसणार तर त्यावरती पुढच्या वर्षी पर्यंत 2 टक्के व्याज द्यावे अश्या प्रकारची आग्रही मागणी केली.यावरती आयुक्त तथा प्रशासक यांनी नागरिकांचे पैसे पुढच्या वर्षीच्या मालमत्ता करात समायोजित करणारच आहोत अश्या प्रकारचे स्पष्ट आश्वासन आंदोलन करणाऱ्यांना दिले. तसेच शहरातील नागरिकांना व्याज परतव्याच्या संदर्भात 2 आठवड्यांची मुदत मागून येत्या 2 आठवड्यात व्याज परताव्या संदर्भात सर्व योग्य बाबी तपासून योग्य निर्णय काँग्रेस पक्षाला देऊ असे आश्वासीत केले. दरम्यान बैठकीपूर्वी अमरावती शहर काँग्रेस कमिटीने अमरावती महानगरपालिकेच्या गेट समोर महाराष्ट्र शासन व प्रशासना विरोधात तीव्र निषेध आंदोलन केले. गोपाल गोपाला देवकनंदन गोपाला,गोपाल गोपाला सद्बुद्धी दे आयुक्तांना卐 असे भजन करत तीव्र नारेबाजी देखील करण्यात आली

## शहर स्वच्छतेवरही मंथन

महिन्याभऱ्या अगोदर झालेल्या काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाच्या बैठकीत याबाबतीत आयुक्तांनी आश्वासन दिले होते की,साफसफाईच्या कंत्राटात 55 मनुष्यबळाचा वापर करण्यात येणार आहे तथापि राजकीय दबावाखाली 55 मनुष्यबळाचा वापर याअटीची अंबलबजावनी महानगरपालिकेकडून घेण्यात आलेली नव्हती त्यामुळे आज शुक्रवार दिनांक 28 फेब्रुवारी 2025 रोजी आंदोलनादरम्यान आयुक्तांसोबत झालेल्या बैठकी दरम्यान साफसफाईच्या कंत्राटात 55 मनुष्यबळाचा वापर ही अट टाकून त्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील तसेच 55 लोक हे हजेरीवर हजर ठेवण्याच्या बाबतीत त्याला सक्ती करण्यात येईल अश्या प्रकारचा निर्णय आंदोलनकर्त्यांच्या समोर जाहीर केला.यावेळी शहर काँग्रेसचे अध्यक्ष बबलु शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार, माजी महापौर अशोक डोंगरे, माजी नगरसेवक बाळासाहेब भुयार, माजी नगरसेवक मुन्ना राठोड, महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे यांनी केले आहे.

# अंजनगावसुर्जी वाहतूक नियंत्रकास मारहाण

## तेल्हारा आगाराच्या मद्यधुंद वाहकाचा प्रताप



दिवाकर सोनार

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, (दि.28)** – कर्तव्यावर असलेल्या वाहतूक नियंत्रकाला मद्यधुंद वाहकाकडून मारहाण करण्यात आल्याची घटना गुरुवारी (ता.27) रोजी अंजनगाव सुर्जी बस स्थानकात घडली. तेल्हारा आगार येथे कर्तव्यावर असलेल्या या मद्यधुंद वाहकाला पोलिसांनी तक्रारीनंतर ताब्यात घेतले.

अंजनगाव सुर्जी बस स्थानकात वाहतूक नियंत्रक म्हणून कर्तव्यावर असलेले दिवाकर सोनार (वय 58 वर्ष) यांनी आपल्या तक्रारीमध्ये सांगितले की, वाहक सुभाष महल्ले हे अंजनगाव सुर्जी येथे एका कार्यक्रमानिमित्त आले होते. ते मद्यधुंद अवस्थेत नियंत्रक कक्षात येऊन फोनवर जोर जोराने बोलत होते. त्यांना कक्षा बाहेर जाऊन बोला कक्षा मध्ये असे जोराने बोलु नका, आमच्या कामकाजात अरथळा निर्माण होतो असे म्हटल्यावर सुभाष महल्ले यांनी सोनार यांना मारहाण केली. यावेळी कर्मचारी पंकज खाडे व सुधाकर काकड हजर होते. त्यांनी सुद्धा महल्ले यांना समजावले व बाहेर आणले परंतु मद्यधुंद असलेल्या महल्ले यांनी पुन्हा कक्षात जावून कोणता 'साहेब आहे तू' म्हणून सोनार यांना धक्काबुक्की करून खुर्ची वरून लोटून दिले. या घटनेमुळे बसस्थानकात कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये भिती चे वातावरण निर्माण झाले होते. वाहतूक नियंत्रक दिवाकर सोनार यांच्या फिर्यादीवरून वाहक सुभाष महल्ले यांच्या विरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास अंजनगावसुर्जी पोलीस करत आहे.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम ( आदिवासी ) विभाग, अमरावती**
**पत्ता :– कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम ( आदिवासी ) विभाग,**
**तपोवन गेट जवळ, पोस्टल कॉलनीया मागे, अमरावती– ४४४६०२**
**( जा.क्र.८०७/सा.बां. आ.वि./निलि/जाहि/दिनांक २७/०२/२०२५ )**
**निविदा सुचना क्र. ४८/२०२४–२५**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, अमरावती हे खालील कामाकरीता ब–१ नमुन्यात निविदा प्रणालीद्वारे (ऑफलाईन) निविदा मागवित आहेत. सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभागातील नोंदणीकृत पात्र पवर्गाकरीता योग्य कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्रे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, अमरावती येथून प्राप्त करून घेण्यात यावी तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, अमरावती यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

निविदा प्रक्रियेत भाग घेणाऱ्या सर्व कंत्राटदारांनी, निविदे सोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची व निविदेची सीलबंद तांत्रिक लिफाफा क्र. १ व सीलबंद वित्तीय लिफाफा क्र. २ निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांका पर्यंत कार्यालयीन वेळेत दुपारी ५.०० पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. सदर लिफाफा सीलबंद रून त्यावर कामाचे नांव व कंत्राटदाराचे नांव नोंदविणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय किंमत | निविदा उपलब्ध कालावधी | निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक | निविदा उघडणे | पात्र कंत्राटदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Current Repairs to Govt. Tribal Girls Hostel at Navasari, Tq. Dist. Amravati | ८,०९,५१०/– | ०३/०३/२०२५ – १०/०३/२०२५ | १०/०३/२०२५ | ११/०३/२०२५ | काम क्र. ०१ ते ०८ फक्त सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभागातील नोंदणीकृत खुला पात्र वर्गा करीता. |
| २ | Current Repairs to Govt. Ashram School WaiKhurd Tq. Warud Dist. Amravati | ८,२०,६२२/– | | | | |
| ३ | Current Repairs To Govt. Ashram School Manikpur Tq. Warud Dist. Amravati | ८,४१,०९६/– | | | | |
| ४ | Repairing of Electrical work at Govt.Adiwasi Ashram School Tembali Tq. Chikhaldara Dist. Amravati (Under Current Repairs Programme) | ४३१,७०८/– | | | | |
| ५ | Repairing of Electrical work at Govt.Adiwasi Ashram School Ranigaon Tq.Dharni Dist. Amravati (Under Current Repairs Programme) | ५८४,५९४/– | | | | |
| ६ | Repairing of Electrical work at Govt.Adiwasi Ashram School, Ranigaon Tq. Dharni Dist. Amravati (Under Specified Repairs Programme) | ३,४७,३६६/– | | | | |
| ७ | Repairing of Electrical work at Govt.Adiwasi Ashram School Susarda Tq.Dharni Dist. Amravati (Under Current Repairs Programme) | ५१६,७०४/– | | | | |
| ८ | Repairing of Electrical work at Govt.Adiwasi Ashram School Bijudhawadi Tq. Dharni Dist. Amravati (Under Current Repairs, Programme) | ५,०७,६९९/– | | | | |

| अ. क्र. | टप्पा | दिनांक व वेळ | कोरे अर्ज मिळण्याचे ठिकाण | परिपूर्ण आवेदन सादर करण्याची पद्धत |
|---|---|---|---|---|
| १ | कोरे निविदा प्रपत्रे विक्री करीता सुरू दिनांक | ०३/०३/२०२५ १०.०० वाजे पासून | कोरे आवेदन अर्ज कार्यकारी अभियंता सा.बां. (आदिवासी) विभाग, अमरावती या कार्यालयात रू. ५९०/– शुल्क चा धनाकर्ष (डीडी) (नापरतावा) कार्यकारी अभियंता, सा.बां. (आदिवासी) विभाग, अमरावती यांच्या नांवे असलेला जोडल्यानंतर कोरे निविदा प्रपत्रे मिळू शकतील | विहित नमुन्यातील अर्ज व सोबत सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे सीलबंद पाकीटातून (तांत्रिक लिफाफा क्र. १ व वित्तीय क्र. २ स्वतंत्रपणे) कार्यकारी अभियंता सा.बां. (आदिवासी) विभाग, अमरावती यांच्या कार्यालयात विहीत दिनांक व वेळेत प्रत्यक्ष अथवा पोष्टाने सादर करावीत. पोष्टाने/प्रत्यक्ष सादर केलेले अर्ज विलंबाने प्राप्त झाल्यास स्वीकारले जाणार नाहीत. |
| २ | परिपूर्ण अर्ज सादर करणे दिनांक व वेळ ठिकाण कार्यकारी अभियंता सा.बां. (आदिवासी) विभाग अमरावती, तपोवन गेट जवळ, पोस्टल कॉलनीच्या मागे अमरावती– ४४४६०२ | १०/०३/२०२५ ५.०० वाजे पासून | | |
| | तांत्रिक लिफाफा क्र. १ व शक्य झाल्यास वित्तीय क्र. २ उघडणे | ११/०३/२०२५ | | |

जिमाका/अम./जाहि./१८२/२०२५

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम ( आदिवासी ) विभाग, अमरावती**


# गोल्डन कार्डने कुटुंबाला 5 लाखापर्यंत उपचार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.28)** – आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी गोल्डन कार्ड देण्यात येत आहे. या कार्डद्वारे प्रत्येक कुटुंबाला 5 लाखापर्यंत मोफत उपचार मिळणार आहे. आपत्कालीन परिस्थितीमध्ये तात्काळ चांगल्या रूग्णालयामध्ये उपचाराची गरज असते. यामुळे गोल्डन कार्ड काढणे महत्त्वाचे झाले आहे. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत 5 लाखापर्यंत उपचार, तसेच मान्यताप्राप्त रूग्णालयात मोफत उपचार करण्यात येते. त्यासाठी आरोग्य विभागाकडून नागरिकांना गोल्डन कार्ड देण्यात येत आहे. सध्या हे कार्ड देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. ज्यांनी हे कार्ड काढलेले नाही त्यांनी जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामपंचायत, नगरपरिषद, आरोग्य कर्मचारी, आशा, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक यांच्याशी संपर्क करावा. व लिस्ट चे करून कार्ड काढून घ्यावे. लाभ घेण्यासाठी पात्रता– आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी शासन निर्णयानुसार सव अंत्योदय, पिवळे, केशरी, पांढरे रेशन कार्ड धारक असावा. जिल्ह्यात विशेष मोहिम– मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या सूचनेनुसार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले व अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण पारिसे यांच्या मार्गदर्शखाली आरोग्य विभाग तसेच इतर विभागाच्या समन्वयाने अमरावती जिल्ह्यात गोल्डन कार्ड काढयाची विशेष मोहिम राबविली जात आहे. गोल्डन कार्डसाठी ऑनलाईन 12 अंकी रेशनकार्ड, आधारकार्ड आणि त्यांच्याशी संलग्नित मोबाईल, स्वत– लाभार्थी, मूळ रेशनकार्ड, आयुष्मान भारत ई–कार्ड, मूळ आधारकार्ड ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

# अट्टल गुन्हेगाराच्या आवळल्या मुसक्या

## परतवाडा पोलिसांची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा, (दि.28)**– दुचाकी चोरी, जबरी चोरी अश्या गुन्हांमध्ये समावेश असलेल्या एका अट्टल गुन्हेगाराला परतवाडा पोलिसांनी जेरबंद केले.

आवेज खान युनुस खान, (वय 26 वर्ष रा. एकता नगर, कांडली, परतवाडा) असे अटक गुन्हेगाराचे नाव आहे. 27 फेब्रुवारी 2025 रोजी फिर्यादी नामे सतीश गोकुळ सराटकर, (वय 30 वर्ष रा. रामनगर, कांडली, परतवाडा) यांनी परतवाडा पोलिसांत तक्रार दाखल केली होती, ज्यामध्ये त्यांनी सांगितले होते की, आरोपी आवेज खान युनुस खान, (वय 26 वर्ष रा. एकता नगर, कांडली, परतवाडा) याने सराटकर यांना चाकुचा धाक दाखवुन त्यांचे चहाचे कॅन्टीन मधील पेटीतुन अंदाजे 2 हजार रुपये लंपास केले. या प्रकरणी परतवाडा पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल करुन आरोपीला ग्राम आष्टी शेत शिवारातून अटक केले. त्याच्याकडून मोटरसायकल, नगदी 1200 रुपये व एक चाकु जप्त केला. या आरोपीने परतवाडा येथील मोटर सायकल चोरीचे एकुण 03 गुन्हे केल्याची कबुली दिली. सदर आरोपीचे घरा बाजुचे झोपडीतुन एम.एच.27 ए.वाय. 5753, एम.एच.27 सि.एफ. 5030, एम.एच.27 बि.जी.3614 या क्रमांकाच्या तीन दुचाकीसुध्दा जप्त करण्यात आल्या. ही कारवाई पोलिस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, सहायक पोलीस अधिक्षक डॉ. शुभम कुमारयांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सुरेश म्हस्के, स.पो.नि.प्रशांत जाधव यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# राज्यात मराठी शाळाच बेदखल



**नितीन दुर्बुडे**

**पथ्रोट, (दि. 28) :** एका बाजूला मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा आनंद आहे, तर दुस?या बाजूला मराठी शाळांकडे विद्यार्थी फिरकत नसल्याने पालकच पाठ फिरवत असल्याने चिंतेचा विषय बनला आहे.

राज्यात अडीच हजार शाळा पटसंख्ये अभावी बंद पडण्याच्या स्थितीत असल्याची धक्कादायक माहीती आहे. विशेषत:, ग्रामीण भागात मुलांची संख्या कमी झाली आहे, तर शहरी भागात इंग्रजी माध्यमाकडे पालकांचा ओढा आहे, त्यामुळे ही परिस्थिती ओढवली आहे.

कोकण विभागात 500, पश्चिम महाराष्ट्रात 700, मराठवाड्यात 400, उत्तर महाराष्ट्रात 300, तर विदर्भात 800 हून अधिक शाळांचा समावेश आहे. विदर्भात जवळपास 986 शाळा या एक आकडी पटसंख्येच्या झाल्या आहेत. 10 पेक्षा कमी पटसंख्या झाल्याने या शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. प्रत्येक जिल्ह्यात सरासरी 150 ते 200 शाळा बंद पडण्याच्या स्थितीत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. एका बाजूला राज्यातील अडीच हजार शाळा पटसंख्येअभावी बंद पडण्याच्या स्थितीत आहेत. दुस?या बाजूला मराठी शाळांमध्ये पटसंख्या वाढावी म्हणून सीबीएसईच्या धर्तीवर पहिलीपासून मराठी भाषा विषयाचा अभ्यास सुरू करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे.

एप्रिलऐवजी जूनपासून शैक्षणिक वर्ष सुरू केले जाणार आहे. सीबीएसई शाळांचा अभ्यासक्रम हा एप्रिलपासून सुरू होतो. मात्र, शिक्षकांनी लगेचच अभ्यासक्रम सुरू होणार नसल्याचे सांगितल्याने शैक्षणिक वर्ष हे आता जूनपासून सुरू करण्याचा निर्णय झाला आहे. मात्र, यामुळे तरी या शाळा तारणार का? याकडे लक्ष आहे.

## मराठी शाळांची भयावह परिस्थिती

विदर्भातील 11 जिल्ह्यांतील जिल्हा परिषदेच्या 986 मराठी माध्यमाच्या शाळा या विद्यार्थी नसल्याने एक आकडी पटसंख्येच्या झाल्या आहेत. राज्यात हजारो मराठी शाळा (6,000 पेक्षा जास्त) एक आकडी पटसंख्येवर आल्या आहेत. म्हणजे पहिली ते चौथी या एकूण चार वर्गांत 10 पेक्षा कमी मराठी विद्यार्थीसंख्या आहे व दिवसेंदिवस अनेक मराठी शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या घटत आहे. दुसरीकडे, इंग्रजी माध्यमाच्या शाळा या भरगच्च दिसत आहेत. त्यामुळे मराठी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. मराठी भाषेवर मोठ्या प्रमाणात राजकारणही होताना दिसत आहे. मात्र, दुसरीकडे मराठी शाळा टिकविण्यासाठी किंवा त्या सुरू राहण्यासाठी कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाहीत.

### पालकांचा इंग्रजीकडे कल

स्पर्धेच्या युगात वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि अन्य उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या प्रवेश परीक्षा इंग्रजीत असतात. भविष्यातील संधींमुळे मराठी पालक आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये घालण्यास प्राधान्य देत आहेत. ग्रामीण भागातसुद्धा इंग्रजी शाळांकडे ओढा वाढत आहे. स्पर्धेच्या युगात अनेक स्पर्धा परीक्षा, वैद्यकीय, अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा या इंग्रजीत घेतल्या जातात म्हणून आमचा पाल्य हा त्यात टिकला पाहिजे म्हणून अनेक पालकांनी आपल्या पाल्यासाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळांना प्रवेश घेतलाय, असे पालक स्पष्ट सांगतात.


**दैनिक महासागर अमरावती वृत्तपत्राच्या मालकी व तपशिलाबाबत माहितीचा तक्ता**

**फॉर्म नं. ४**

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती |
| प्रकाशन | : | दैनिक |
| मुद्रकाचे नांव | : | श्रीकृष्ण तनसुखदास चांडक |
| मुद्रणालय | : | अरूणोदय प्रेस कॉटन मार्केट, नागपूर |
| संपादकाचे नांव | : | श्रीकृष्ण तनसुखदास चांडक |
| मालकाचे नांव | : | श्रीकृष्ण तनसुखदास चांडक |
| पत्ता | : | टेकडी रोड, सीताबर्डी, नागपूर |

मी श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुद्रक, प्रकाशक दैनिक महासागर अमरावती जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरा आहे.

दिनांक १ मार्च २०२५

श्रीकृष्ण तनसुखदास चांडक
(प्रकाशकाची सही)



आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक –श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

पुण्यात फलटण या आपल्या गावी निघालेल्या तरुणीवर शिवशाही बसमध्ये अत्याचार झाला अन् महाराष्ट्र हादरला. स्वारगेट एसटी स्टँड मधील ही घटना लाज वाटणारीच आहे. पुण्यातील ही घटना अतिशय धक्कादायक आहे. आरोपी सापडल्याने महाराष्ट्र सरकारने कठोरातील कठोर कारवाई काय असावी, हे पाहून निर्णय घ्यावा. प्रत्येक एसटी बस स्टँडवर महिलांच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षा रक्षक किंवा लहान-मोठी पोलीस चौकी असावी, असे एसटी महामंडळाचे धोरण आहे. पण या चौक्याच बाराही महिने बंद असतात, ही वस्तुस्थिती मान्यच करावी लागेल. बस स्थानक आवार गुन्हेगारांचे अड्डे बनले आहेत. तेथील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या गुन्हेगारांवर कठोर कारवाई व्हायलाच हवी अशी प्रत्येक नागरिकाची सरकारकडे मागणी असूनही उपयोग होत नाही. शेवटी अक्कू यादव प्रकरणाप्रमाणे लोक कायदा हातात घेवून परस्पर निवाडा करतील असे दिसते. स्वारगेट बस डेपो येथे 'त्या' तरुणीवर झालेल्या बलात्काराचा फक्त निषेध करून चालणार नाही. कारण पुणे शहरातील सर्वांत वर्दळीच्या, रहदारीच्या ठिकाणांपैकी एक असलेल्या स्वारगेट बस डेपो येथे त्या तरुणीवर बलात्कार झाल्याची ही घटनाच अत्यंत संतापजनक व निंदनीय आहे. लक्ष्मीचे, सरस्वतीचे रुप असलेल्या आपल्या भगिनीवर विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यात झालेला अत्याचार आपल्या सर्वांचीच मान शरमेने खाली घालणारा आहे. केवळ राजकारणात व्यस्त असलेले, आपल्याच मंत्र्यांची कातडी वाचवण्यात व्यस्त असलेले सरकार, दिल्लीच्या पायाशी लोळण घालण्यात मग्न असलेले सरकार हेच पुण्याच्या या दयनीय अवस्थेला, आपल्या माता भगिनिंच्या दुर्दशेला जबाबदार आहेत. पुण्यातील या दुर्दैवी घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारुन कुणीही मंत्री राजीनामा देणार नाही, याची जनतेला पूर्ण खात्री आहे. तर दुसरीकडे सरकारचे डोके ठिकाणावर आहे का? असा प्रश्न विचारणारे कुठे गायब झाले? चैन स्नॅचिंग, महिला बलात्कार, गुन्हेगारी, मर्डर चोऱ्या ह्यावर पोलीस आणि शासन यांचे कोठलेही लक्ष दिसत नाही. संतोष देशमुखांची मारेकरी अजून फरारी आहे आणि सरकारने पुणे शहरातील स्वारगेट येथील बलात्कारावर भाष्य केले आहे की, आरोपीला फाशी देवू. आता गुन्हेगार पकडालाच आहे, तर कृती काय करणार यावर बोलले पाहीजे. शासन आणि पोलीस प्रशासन निगरगट्ट झाले आहे. नंबर प्लेट, दारु अश्या मधून महसूल गोळा करण्याकडे फक्त हे सरकार लक्ष देत आहे. बाकी महाराष्ट्रातील जनतेकडे सरकारचे लक्ष नाही, हे नागरीकांनी लक्षात ठेवावे. या प्रकरणातील मुख्य आरोपी दत्तात्रय गाडे याला शोधण्यासाठी पोलिसांना ग्रामस्थांनी केलेली मदत कधीही विसरता येणार नाही. कुणीही या आरोपीला थारा दिला नाही. म्हणून शेवटी त्याला शेतात लपून बसावे लागले. परंतु प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवडल्या हे मात्र बरे झाले!

# एसटीच्या 'शिवशाही'त निर्माण झाली 'मोगलाई'!




या देशांमध्ये निर्भया प्रकरण घडल्यानंतर पुन्हा असा प्रकार होणार नाही, इतके मोठे आंदोलन देशभर झाले होते. त्यामध्ये तत्कालीन काँग्रेस सरकार पूर्ण बदनाम झाले होते. ते आंदोलन देशभर पसरले होते व त्याची गरजही होती. परंतु आंदोलनकर्त्यांचा हेतू देशातील सरकार खाली कसे खेचता येईल हाच होता, हे कालांतराने सिद्ध झाले. त्यामुळे आता एखादे आंदोलन सुरू झाल्यानंतर त्यामागे काही वेगळा हेतू तर नाही ना? अशी शक्यता जनताच व्यक्त करत असते.

पुण्यातील घटना ही अतिशय निंदाजनक आहे. यापूर्वी एका मद्यधुंद तरुणाने आपल्या श्रीमंतीचे दर्शन घडवितांना दोन तरूण जीव घेऊन टाकले होते. त्यावेळी पुणेकर मोठ्या संख्येने एकत्र आले होते. परंतु स्वारगेट प्रकरणात मात्र पुणेकर अत्यंत सावध प्रतिक्रिया देत आहेत. शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस सध्या याप्रकरणी फ्रंटफूटवर आंदोलन करीत आहे. पण बाकी संघटनांचं काय? हा प्रश्न निर्माण झालाच आहे.

राजकीय पक्षांचे जोडे बाहेर काढून पुणेकरांनी या प्रकरणी एकत्र येण्याची गरज आहे. कारण सराईत गुन्हेगार आता आपल्या आजूबाजूला फिरकायला लागले आहेत. पुण्यातील स्वारगेट डेपोत एका तरुणीवर सराईत गुन्हेगाराने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना सर्वांची मान शरमेने खाली घालणारी आहे. दत्तात्रय गाडेकर या गुन्हेगाराने स्वारगेट एसटी आगारात उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये तरुणीवर अत्याचार केले. ही तरुणी पुण्यात परिचारिका म्हणून काम करत होती. ती फलटणला आपल्या गावी जाण्यासाठी निघाली होती. त्यावेळी दत्तात्रय गाडे याने तिला हेरुन तिच्यावर अतिप्रसंग केला.

या पीडित तरुणीच्या वैद्यकीय तपासणीचा अहवाल समोर आला आहे. यामध्ये दत्तात्रय गाडे याने पीडित तरुणीवर एकदा नव्हे तर दोनवेळा बलात्कार केल्याचे स्पष्ट झाले आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये ते दोघे बोलत असल्याचं दिसत आहे.

दुसऱ्या बसजवळ नेल्यानंतर पीडितेनं त्याला विचारलं की, बसमध्ये अंधार आहे. तर त्यावर आरोपीनं तिला उत्तर दिलं की बस उशीरा आली आहे, त्यामुळे सगळे प्रवासी झोपले आहेत. तू टॉर्च लावून स्वतः बघ, असं म्हणून त्याने तिचा विश्वास प्राप्त केला.

ती बसमध्ये गेली आणि त्यानंतर मग आरोपीने बसचा दरवाजा बंद करुन तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर हा आरोपी फरार झाला. त्यानंतर पीडिताही घरी जात होती. जाताना तिने आपल्या मित्राला फोन केला आणि झालेली हकिगत सांगितली. तेव्हा त्याने पोलिसांमध्ये तक्रार करण्यास सांगितल्यावर या पीडितेनं तक्रार केली.

स्वारगेट पोलीस स्थानकापासून शंभर मीटर अंतरावर असलेल्या एसटी डेपोत एका तरूणीवर दोनवेळा बलात्कार होतो आणि कोणाला पत्ताही लागत नाही. मग सुरक्षा रक्षक कशासाठी नेमले जातात? स्वारगेट एसटी आगारात असलेली सुरक्षा यंत्रणा केवळ नावापुरतीच असल्याचे दिसले.



थर्ड अम्पायर
जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

गेल्या काही महिन्यांमध्ये पुण्यात सातत्याने खून, मारामाऱ्या, कोयता गँगची दहशत आणि आता बलात्कार अशा घटना सातत्याने घडत आहेत. त्यामुळे पुण्यातील सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मुलींनी अनोळखी व्यक्तींशी बोलताना काळजी घेणं खूप गरजेचं आहे. शासकीय यंत्रणा, चौकशी कक्ष हे मदतीला असतातच तर त्यांच्याशी संवाद साधायला हवा होता. मात्र दुदैवाने या मुलीने अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवला आणि पुढे हा गंभीर आणि वेदनादायी प्रसंग घडला. परिवहन मंत्री व गृहराज्यमंत्री सवंग लोकप्रियतेच्या घोषणा करीत असले, तरी त्यांच्याकडून विशेष अपेक्षा व्यक्त बाळगणे योग्य ठरणार नाही. केवळ औपचारिकता म्हणून ते पुण्यात फिरकतील व निघून जातील. पण पुणेकरांना आपली जबाबदारी आपल्यालाच पार पाडावी लागणार आहे, याचे भान ठेवावे लागेल.

आरोपी सापडल्याने काही नवीन माहिती मिळते का? तेही पहावे लागणार आहे. शिरूर तालुक्यातील गुनाट गावातून दत्तात्रय गाडेला बेड्या ठोकण्यात आल्या. मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास त्याला अटक करण्यात आली. त्याचा युद्धपातळीवर शोध सुरू होता. स्वारगेट बस स्थानकात तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्यानंतर तो आपल्या गुणाट या गावी गेला असल्याचे समोर आले होते. तसेच गावकऱ्यांनी त्याला गावात पहिल्याचे पोलिसांना समजले होते.

त्यानुसार पोलिसांनी गुनाट या गावातच त्याचा शोध घेण्याची ठरवले. त्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त मागविण्यात आला. गुनाट गावात आणि आजूबाजूच्या परिसरात त्याचा शोध सुरू झाला. ड्रोनच्या माध्यमातून उसाच्या परिसरात पोलीस त्याचा शोध घेत होते. मात्र सायंकाळपर्यंत तो सापडला नव्हता.

अखेर मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास तो एका शेतात पोलिसांना सापडला. पुणे पोलिसांची १३ पथके रवाना करण्यात आली होती. तसेच डॉगस्कॉड, ड्रोनच्या साहाय्यानेही आरोपीची शोधमोहीम सुरु होती. घटनेच्या दोन दिवसांनंतरही पोलिसांना आरोपी न सापडल्याने, पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

■ ■ ■

## महिलांसाठी सुरक्षित जागा राहिलीच नाही का?

पोलीस कर्मचारी बस स्थानकावर वेळोवेळी गस्त घालत असतात. तरीही अशा पद्धतीचा घृणास्पद गुन्हा करण्याची आरोपीची हिंमत होते ही बाब गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरलेला नाही हे दर्शविणारी दिसते. राज्यात महिलांसाठी सुरक्षित जागा राहिलीच नाही का? असा प्रश्नही यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. पुण्यात दररोज कुठे ना कुठे गंभीर गुन्हे घडतच आहेत. त्यावर आळा घालण्यात गृहखात्याला यश आलेले नाही. ही घटना म्हणजे कायदा सुव्यवस्थेची कशा पद्धतीने दुर्दशा झाली याचे प्रत्यंतर देणारी आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमधून स्वारगेट बस स्थानकावर मोठ्या संख्येने महिला प्रवासी येतात. परंतु स्वारगेट बस स्थानकामध्ये कुठल्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नाहीत. रात्रीच्या वेळेस या बस स्थानकामध्ये प्रचंड अंधाराचे साम्राज्य असते. यावेळी अनेक महिला भगिनींची कुचंबना होते. बस स्थानक परिसरात अनेक वेळेस माथेफिरू, दारुडे बसलेले असतात. ही घडलेली घटना त्या आरोपीच्या गलिच्छ मानसिकतेतून घडलेली घटना असली, तरी ही घटना घडण्यास पोषक असे वातावरण करणारे बस स्थानक प्रशासन व पेट्रोलिंग वरील पोलीस अधिकारी हे देखील या घटनेला तितकेच जबाबदार आहेत. एसटीतील सुरक्षा कर्मचा?यांना निलंबित करून टाकण्यात आले आहे. परंतु दुर्लक्ष करणाऱ्या पोलिसांबाबत शासन काय निर्णय घेणार हे ही कळाले पाहिजे.

## आरोपी सराईत गुन्हेगार निघाला

आरोपी दत्तात्रय गाडे हा पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील गुनाट गावचा रहिवासी आहे. त्याचे काही राजकीय कनेक्शन सुद्धा समोर आले आहेत. शिरुरचे माजी आमदार अशोक पवार यांचा एक बॅनर लागला आहे. त्या राजकीय बॅनरवर आरोपी दत्तात्रय गाडेचा फोटो आहे. त्याशिवाय दत्तात्रय गाडेच्या व्हॉट्सअप डीपीवर आमदार माऊली कटकेंचा फोटो आहे. आरोपी दत्तात्रय गाडे गावात आमदार माऊली कटकेंचा कार्यकर्ता म्हणून फिरत असायचा अशी सुद्धा माहिती आहे. स्वारगेट पोलीस स्टेशनकडून मिळालेल्या माहितीनुसार त्याच्यावर आसपासच्या परिसरात चोरी, दरोडेखोरी आणि चेन स्नॅचिंगचे गुन्हे दाखल आहेत. पुणे पोलिसांनी अथक प्रयत्न करून आरोपीला पकडले नसते, तर पोलिसांचीही नाचक्की झाली असती. म्हणून पुणे पोलिसांनी आरोपीची माहिती देणाऱ्यास एक लाख रुपयांच इनाम जाहीर केलं होतं. आरोपीवर पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यात अनेक गुन्हे सुद्धा दाखल आहेत. धक्कादायक बाब म्हणजे आरोपी पुण्यात दुष्कृत्य करून आपल्या गावात आला होता. त्याने घरी विश्रांती घेऊन गावातच मुक्काम केल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. परिसरातील शेतात तो लपून बसल्याची माहिती खरी होती. पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो गुन्हेगार असूनही बस डेपोच्या आवारात फिरताना पोलिसांना संशय कसा आला नाही? हा प्रश्न मात्र सर्वांनाच निरुत्तर करतो.

# महाकुंभ : महाअपघात



महाकुंभात 60 कोटींहून अधिक भाविक पोहोचले आणि एक विक्रम रचला. पण असे बरेच लोक होते जे घरी परतू शकले नाहीत. महाकुंभाच्या 43 दिवसांत 100 हून अधिक रस्ते अपघातात 150 लोकांचा मृत्यू झाला.

अपघातांमध्ये 385 लोक जखमी झाले आहेत. यातील अनेक लोकांना आता अपंगत्वाचे जीवन जगावे लागेल. बहुतेक अपघात राष्ट्रीय महामार्ग-2 वर झाले. आग्रा-कानपूर-प्रयागराज-वाराणसी मार्गे दिल्लीला कोलकाताशी जोडणाऱ्या या राष्ट्रीय महामार्गावर 40 हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. सर्वात मोठा अपघात प्रयागराज-मिर्झापूर रस्त्यावर झाला, ज्यामध्ये 10 जणांचा मृत्यू झाला आणि 19 जण जखमी झाले. अपघाताचे प्रमुख कारण काय होते? शेवटी, राष्ट्रीय महामार्ग-2 वर सर्वाधिक अपघात का होतात?

प्रयागराज-मिझार्पूर रस्त्यावर महाकुंभ यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या बोलेरो आणि बसची टक्कर झाली, ज्यामध्ये 10 जणांचा मृत्यू झाला आणि 19 जण जखमी झाले.

13 जानेवारीपासून सुरू झालेला प्रयागराज महाकुंभ महाशिवरात्रीला संपला. अवघ्या 43 दिवसांत भाविकांची संख्या 60 कोटींच्या पुढे गेली. म्हणजेच दररोज सरासरी 1.5 कोटी लोक त्रिवेणीत स्नान करण्यासाठी येत होते. यामध्ये बहुतेक लोक रस्त्याने पोहोचत होते.

प्रयागराजला देशातील इतर शहरे आणि राज्यांशी जोडणारे 6 प्रमुख मार्ग आहेत. प्रयागराज-वाराणसी महामार्ग पुढे बिहार, झारखंड मार्गे कोलकात्याला जातो. त्याच वेळी, हा महामार्ग प्रयागराजहून कौशांबी, फतेहपूर, कानपूर मार्गे दिल्लीला आग्रा-मथुराशी जोडतो. 43 दिवसांत, या महामार्गावर 40 लोकांचा मृत्यू झाला. यामध्ये प्रयागराज-कानपूर महामार्गावर 14 जणांचा आणि प्रयागराज-वाराणसी महामार्गावर 15 जणांचा मृत्यू झाला आहे. या महामार्गावर इतर जिल्ह्यांमध्ये आणि राज्यांमध्ये इतर मृत्यू झाले आहेत.

15 फेब्रुवारी रोजी प्रयागराज-मिझार्पूर राज्य महामार्गावर छत्तीसगडहून भाविकांना घेऊन जाणारी बोलेरो आणि मध्य प्रदेशातील राजगडला जाणारी भाविकांना घेऊन जाणारी बस यांची टक्कर झाली. या अपघातात बोलेरोमध्ये प्रवास करणाऱ्या सर्व 10 जणांचा मृत्यू झाला. त्याच वेळी, बसमधील 19 जण जखमी झाले. अपघातानंतर 4 तास वाहतूक कोंडी सुरूच होती. कोरबा जिल्ह्यातील लोक बोलेरोमधून प्रवास करत होते. ते महाकुंभात स्नान करण्यासाठी येत होते.

प्रयागराज मेळा परिसरात झालेल्या या अपघातात बोलेरोचे मोठे नुकसान झाले. बोलेरो कापून मृतदेह कसे तरी बाहेर काढण्यात आले.

**अपघातांची तीन प्रमुख कारणे**

1 : चालकांचा थकवा आणि पुरेशी झोप न मिळणेः मोठ्या संख्येने भाविक स्नान करण्यासाठी रस्त्याने संगम येथे पोहोचले. याचा परिणाम असा झाला की प्रयागराजकडे जाणाऱ्या बहुतेक मार्गांवर भाविकांना 7 ते 9 तासांपर्यंत वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागले. जेव्हा तो जाममधून बाहेर यायचा तेव्हा तो पूर्णपणे थकलेला असायचा. म्हणूनच बहुतेक अपघात लांब पल्ल्याच्या वाहनांमुळे झाले. रात्री प्रवास करताना झोपी जाणे आणि प्रचंड थकवा, तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून पडणे यामुळे मानसिक ताण यामुळे चालकांचे नियंत्रण सुटत आहे.

2 : हाय स्पीडः प्रयागराजला जोडणारे सर्व प्रमुख महामार्ग चार-लेन किंवा सहा-लेन आहेत. चांगल्या रस्त्यांमुळे चालक जास्त वेगाने गाडी चालवतात. या काळात, थोडीशी झोप किंवा चूक देखील अपघातास कारणीभूत ठरू शकते.

प्रयागराज-कानपूर महामार्गावर असाच एक अपघात पाहायला मिळाला. फतेहपूरमधील भरतपूर वळणावर, राजस्थानच्या धोलपूर जिल्ह्यातील भाविकांना घेऊन जाणारी एक पिकअप गाडी काही वेळ थांबली. भाविक गाडीतून खाली उतरले आणि रस्त्यावर उभे राहिले. त्यानंतर मागून येणाऱ्या एका वेगवान कारने 7 जणांना चिरडले.

3 : रस्त्याच्या कडेला विविध ठिकाणी बेशिस्तपणे पार्क केलेली वाहनेः रस्त्याच्या कडेला पार्क केलेल्या वाहनांशी टक्कर झाल्यामुळे अनेक अपघात झाले आहेत. रस्त्यावर उभ्या असलेल्या या वाहनांचे बॅकलाइट बंद असल्याने, चालकांना स्वतःवर नियंत्रण ठेवण्याचीही संधी मिळाली नाही.

प्रयागराज-मिझार्पूर रस्त्यावरील तुलसी गावाजवळील एका ढाब्याजवळ उभ्या असलेल्या ट्रकला तेलंगणातून भाविकांना घेऊन जाणाऱ्या एका कारने धडक दिली. या अपघातात 4 जणांचा जागीच मृत्यू झाला. कोलकाताहून प्रयागराजहून परतणाऱ्या भाविकांची गाडी धनबाद जिल्ह्यात मागून एका ट्रकला धडकली. या अपघातात 6 जणांचा मृत्यू झाला.

चालक मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त राहत नाही. थकव्यामुळे शरीर आणि मनाचे संतुलन बिघडू लागते. क्षणभरही मन विचलित होणे अपघात घडवून आणण्यासाठी पुरेसे आहे. महाकुंभ आटोपून दक्षिणेकडे जाणाऱ्या अनेक वाहनांचा विदर्भात अपघात होवून अनेकजण दगावलेत.

■ ■ ■

# महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

राज्यात महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विद्येचे माहेरघर आणि सुसंस्कृत शहर अशी ओळख असलेल्या पुण्यातील गजबजलेल्या आणि सर्वाधिक वर्दळ असणाऱ्या स्वारगेट बस स्थानकात एका सराईत गुन्हेगार असलेल्या नराधमाने बस स्थानकातच उभ्या राहिलेल्या शिवशाही बसमध्ये एका सव्वीस वर्षीय तरुणीवर बलात्कार केला.

स्वारगेट सारख्या वर्दळीच्या बस स्थानकात घडलेल्या या घृणास्पद घटनेने संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. पुण्यासारख्या देशाच्या सांस्कृतीक राजधानीत आणि विद्येच्या माहेरघरात एका तरुणीची अब्रू लुटली गेल्याने पुण्यासारख्या सुसंस्कृत शहराची मान शरमेने खाली झुकली आहे.

एकेकाळी पुणे हे मुलींसाठी सर्वात सुरक्षित शहर समजले जात होते मात्र मागील काही वर्षापासून पुण्याची ही ओळख पुसली जात आहे. या घृणास्पद घटनेने केवळ पुण्याचीच नव्हे तर पुरोगामी महाराष्ट्राची मान शरमेने खाली झुकली आहे.

पुण्यात घडलेली ही महिला अत्याचाराची घृणास्पद घटना ही काय राज्यातील पहिली घटना नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात महिला अत्याचाराची एक तरी बातमी हमखास वाचायला मिळते. दोन वर्षापूर्वी पहाटे कामावरून घरी परतणाऱ्या एका संगणक अभियंता तरुणीवर रिक्षा चालकाने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना पुण्यातीलच वानवडी परिसरात घडली होती.

त्याआधी मुंबईतील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थिनीचा विनयभंग करून सुरक्षा रक्षकाने तिची हत्या केली होती. पुण्यातच एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थिनीची हत्या झाली होती. मुंबईत छत्रपती शिवाजी टर्मिनसहुन वाशिकडे हार्बर रेल्वेने परीक्षेसाठी येणाऱ्या वीस वर्षीय तरुणीवर एका नराधमाने मज्जीद बंदरजवळ धावत्या डब्यातच लैंगिक बळजबरी करण्याचा प्रयत्न केला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपर्डी येथील निर्भयावर झालेल्या अत्याचाराने तर संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला होता.बदलापुरात चार वर्षीय चिमुरडीवर शाळेतच झालेल्या अत्याचाराने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला होता. बदलापुरची घटना तर मानवतेला काळीमा फासणारी होती.

अलीकडच्या काळात महाराष्ट्रात अशा घटनांची मालिकाच सुरू आहे. राज्यात महिला अत्याचाराची घटना घडली सर्वत्र संतापाची लाट उसळते. मोर्चे निघतात. निषेध व्यक्त होतो. इलेक्ट्रॉनिक मिडियात चर्चा होते. प्रिंट मीडियात अग्रलेख लिहिले जातात. राजकीय पक्ष एकमेकांवर आरोपांच्या फैरी झाडतात. शासनाकडून घटनेच्या चौकशीचे आणि पोलिसांकडून आरोपींना कठोर शिक्षा देण्याचे आश्वासन दिले जाते. अर्थात घटना घडून गेल्यानंतर आरोपींना पकडुन शिक्षा देण्यापेक्षा महिला अत्याचाराच्या घटना घडूच नये यासाठी पोलिसांनी प्रयत्न करायला हवेत.

दिवसाढवळ्या महिलांची अब्रू लुटून त्यांची हत्या करण्याची नाराधमी प्रवृत्ती अलीकडे जोर धरू लागली आहे. दिवसाढवळ्या अशा प्रकारचे गुन्हे करण्याची हिंमत नराधमांमध्ये निर्माण होते याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा आणि राज्यातील सुरक्षा यंत्रणांचा धाक राहिला नाही.

आपण कितीही मोठा गुन्हा केला तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही. पैशाच्या जोरावर आपण कायदा आणि सुरक्षा यंत्रणांना आपण वाकवू शकतो अशीच धारणा या नराधमांची झाली आहेए म्हणूनच ते असे मानवतेला काळिमा फासणारे कृत्य करत आहेत.

शिव, शाहू फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या घटना शोभणीय नाहीत. पुरोगामी महाराष्ट्रालाशरमेने खाली मान घालायला लावणाऱ्या या घटना आहेत.

महिलांकडे उपभोगी वस्तू म्हणून पाहण्याची पुरुषी मानसिकता वाढू लागली आहे. आज राज्यातील कोणत्याच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाच आजी. शाळा, कॉलेज, कामाचे ठिकाण, सार्वजनिक वाहन, स्वतःचे घर इतकेच काय तर पोलीस स्टेशन देखील महिलांसाठी सुरक्षित नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल.

महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी ही लाजिरवाणी बाब आहे. पूर्वी अशा घटनांसाठी बिहार आणि उत्तरप्रदेश ही राज्ये प्रसिद्ध होती आता त्यात महाराष्ट्राची भर पडते की काय अशी शंका येऊ लागली आहे.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

महाराष्ट्राचा बिहार, उत्तरप्रदेश होऊ नये यासाठी सरकारने आणि पोलीस दलाने महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करायला हव्यात तसेच संबंधित गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या नराधमांना फाशीचीच शिक्षा द्यायला हवी तसे झाले तरच राज्यातील महिला अत्याचाराच्या घटनांना आळा बसेल आणि पुरोगामी महाराष्ट्र ही महाराष्ट्राची ओळख कायम राहील.

■ ■ ■

## अक्रोड की बदाम? मेंदूला तल्लख ठेवण्यासाठी जास्त फायदेशीर काय?



मेंदू हा शरीराचा सर्वात महत्वाचा भाग आहे. त्यामुळे मेंदूचे आरोग्य चांगले राहण्यासाठी आपण आपल्या डाएट फूडमध्ये अक्रोड आणि बदामाचा समावेश करत असतो. मानसिक आरोग्य आणि तल्लख स्मरणशक्तीसाठी अक्रोड आणि बदामाचे सेवन अधिक फायदेशीर ठरते, यामुळे मेंदूचे कार्य अधिक सुधारते. बदामांमध्ये असलेले व्हिटॅमिन ई, अँटीऑक्सिडंट्स आणि हेल्दी फॅट असतात, जे मेंदूला सक्रिय ठेवतात आणि स्मरणशक्ती वाढवतात.

अक्रोडला ब्रेन फूड म्हंटले जाते. कारण यामध्ये असलेले ओमेगा-३ फॅटी ॲसिडने समृद्ध असते, जे मेंदूचे न्यूरॉन्स मजबूत करण्यास आणि विचार करण्याची तसेच समजून घेण्याची क्षमता वाढविण्यास मदत करतात.

अशा परिस्थितीत मेंदूला तल्लख करण्यासाठी अक्रोड अधिक फायदेशीर आहे की बदाम जास्त प्रभावी आहे, याबाबत अनेक लोकांच्या मनात प्रश्न उपस्थित होतात.

**बदाम की अक्रोड फायदेशीर?**

जर बदाम आणि अक्रोडमध्ये तुलना केली तर अक्रोड हे मेंदूसाठी थोडे अधिक प्रभावी मानले जाते कारण त्यात ओमेगा-३ फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात असते, जे मेंदूच्या आरोग्यासाठी खूप महत्वाचे आहे. अक्रोडचे सेवन केल्याने स्मरणशक्ती सुधारण्यास, लक्ष केंद्रित करण्यास आणि न्यूरॉन्स मजबूत करण्यास मदत होते. जे लोकं नियमितपणे अक्रोड खातात त्यांना डिमेंशिया आणि अल्झायमर सारख्या आजारांचा धोका कमी असतो. तेव्हा अक्रोड नेहमी भिजवून आणि योग्य प्रमाणात खावेत.

**बदाम फायदेशीर नाहीत का?**

मेंदूच्या आरोग्यासाठी अक्रोड अधिक फायदेशीर मानले जाते तर बदाम फायदेशीर नाही का? असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. बदाम मेंदूसाठी देखील फायदेशीर आहे. बदामांमध्ये व्हिटॅमिन ई, अँटीऑक्सिडंट्स आणि हेल्दी फॅट असतात, ज्यामुळे मेंदू सक्रिय राहतो आणि मानसिक थकवा कमी होतो. विशेषतः भिजवलेले बदाम स्मरणशक्ती सुधारण्यास मदत करतात.

■ ■ ■

अशोकायन
प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## कॉपी मुक्तीची शपथ

एकमेकांच्या हीत संबंधामुळे
गैरमार्गाचे वाढले प्रस्थ
शपथ देणारे घेणारे व्यस्त
कॉपी मुक्तिचे चित्र कसे मस्त ..

उक्ति व कृतीत परिक्षेत
दिसुन येते विसंगती
म्हणून शपथेचा प्रभाव
दिसून येईल कसा व किती ? ..

नियमांचे व्हावे कडक पालन
करु नये कुणाचाही मुलाहीजा
दोषींना द्याल फास्ट सजा
तरच परिणाम दिसेल ना राजा..!

# आयआयएम मुंबईमधील तीन विद्यार्थीनींना पीअँडजी शिक्षा बेटियां स्कॉलरशिपसह पुरस्कारित करण्यात आले




**मुंबई, २८ फेब्रुवारी :** एरियल, टाइड, जिलेट इत्यादी सारख्या ब्रँड्सची उत्पादक कंपनी प्रॉक्टर अँड गॅम्बल इंडिया (पीअँडजी इंडिया)ने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मुंबई (आयआयएम मुंबई) येथे एसटीईएम कोर्सेसचे शिक्षण घेणाऱ्या तीन विद्यार्थीनींना पीअँडजी शिक्षा बेटियां स्कॉलरशिपसह सन्मानित व पुरस्कारित केले. पीअँडजी इंडिया सेंटर फॉर सिव्हिल सोसायटीसोबत सहयोगाने हा प्रोग्राम राबवते. आयआयएम मुंबई इक्वॉलिटी समिटच्या निमित्ताने ही स्कॉलरशिप देण्यात आली. याप्रसंगी स्वतंत्र बोर्ड संचालक, महाराष्ट्र शासनाचे माजी प्रमुख सचिव व महाराष्ट्राच्यामाननीय मुख्यमंत्रींचे माजी प्रमुख सल्लागार सिताराम कुंटे, पीअँडजी इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व्ही. कुमार, आयआयएम मुंबईचे संस्थापकीय संचालक मनोज कुमार तिवारी, सेंटर फॉर सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित चंद्रा यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

कंपनीचा प्रमुख सीएसआर उपक्रम 'पीअँडजी शिक्षा'चा भाग असलेला स्कॉलरशिप प्रोग्राम अद्वितीय उपक्रम आहे, जो एसटीईएम (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व गणित) शिक्षण घेणाऱ्या वंचित समुदायांमधील मुलींना आर्थिक साह्य व मार्गदर्शन देतो. या उपक्रमाचा उत्पादन, निर्मिती, व्यावसायिक व इतर एसटीईएम क्षेत्रांमध्ये कुशल महिला व्यावसायिकांच्या प्रवेशाला पाठिंबा देण्याचा मनसुबा आहे. पीअँडजी शिक्षाने सलग तिसऱ्या वर्षी आयआयएम मुंबईमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींना स्कॉलरशिप दिली आहे.

याप्रसंगी आपले मत व्यक्त करत पीअँडजी इंडियाच्या सीएसआर अँड कम्युनिकेशन्सच्या प्रमुख एनाक्षी देवा म्हणाल्या, ''गेल्या दोन दशकांत पीअँडजी शिक्षाने विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून वंचित समुदायांमध्ये सकारात्मक परिणाम घडवून आणला आहे. आमचा विश्वास आहे की शिक्षण प्रबळ स्रोत आहे, जे व्यक्ती, कुटुंबंव समुदायांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणते. आर्थिक साह्य आणि मार्गदर्शनदेत पीअँडजी शिक्षा बेटियां स्कॉलरशिपचा या प्रतिभावान तरूणींना एसटीईएममधील भावी महिला प्रमुख बनण्यास सक्षम करण्याचा मनसुबा आहे. मला यंदा या तीन युवाव उत्कृष्ट मुलींना आयआयएम मुंबई येथे पुरस्कारित करताना पाहण्याचा आनंद होत आहे. आम्ही आशा करतो की, हा सपोर्ट या तरूणींना शैक्षणिक व करिअर क्षेत्रात उत्तम कामगिरी करण्यास सक्षम करेल.''

आयआयएम मुंबई इक्वॉलिटी समिटच्या ५व्या पर्वाच्या निमित्ताने या स्कॉलरशिप्स देण्यात आल्या. या समिटमध्ये सरकार, कॉर्पोरेट क्षेत्र व शैक्षणिक संस्थांमधील प्रमुख भागधारकांनी एसटीईएम करिअरमध्ये महिलांचे प्रतिनिधीत्व वाढवणाऱ्या विषयांबाबत चर्चा केली, तसेच पुरवठा साखळी व उत्पादनावर प्रमुख फोकस देण्यात आला.



# रॉयल एनफिल्डने पश्चिमेकडील नवीन वेअरहाऊससह स्पेअर्स लॉजिस्टिक्स नेटवर्क प्रबळ केले

**मुंबई, २८ फेब्रुवारी :** रॉयल एनफिल्ड या मध्यम आकाराच्या मोटरसायकल सेगमेंटमधील (२५०सीसी-७५०सीसी) जागतिक अग्रणी कंपनीने भिवंडी (ठाणे) मध्ये नवीन वेअरहाऊसचे उद्घाटन केले आहे, ज्यामुळे पश्चिम व मध्य भारतात जेन्यूएन पार्ट्सच्या त्वरित उपलब्धतेची खात्री मिळेल आणि सर्विस कार्यक्षमतेमध्ये सुधारणा होईल. धोरणात्मकरित्या स्थित हे केंद्र महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश आणि गोव्यामधील रॉयल एनफिल्डच्या ग्राहकांकरिता स्पेअर पार्ट्स, ऑईल व ल्यूब्ससाठी ट्रान्झिट वेळ मोठ्या प्रमाणात कमी करेल.

५०,००० चौरस फूट जागेवर पसरलेल्या या नवीन वेअरहाऊसमध्ये ३,५०० हून अधिक एसकेयूचा साठा समाविष्ट होईल, ज्यामुळे ३१० हून अधिक चॅनेल भागीदारांकडून जेन्यूएन पार्ट्स आणि रॉयल एनफिल्ड आवश्यक वस्तूंसाठी वाढत्या मागणीची कार्यक्षमपणे पूर्तता होईल. भिवंडी, ठाणे येथे स्थित नवीन केंद्र मुंबई एअरपोर्टपासून जवळपास ४५ किमी अंतरावर आहे आणि प्रांतातील आरई नेटवर्ककरिता लॉजिस्टिक्स सुव्यवस्थित करते, तसेच विक्रीपश्चात्त सर्विस टीएटी कमी करते.

नवीन पार्ट्स वेअरहाऊसच्या उद्घाटनाप्रसंगी मत व्यक्त करत रॉयल एनफिल्डचे चीफ कमर्शियल ऑफिसर यदविंदर सिंग गुलेरिया म्हणाले, ''रॉयल एनफिल्डमध्ये आम्ही ग्राहकांना विनासायास व त्रासमुक्त मालकीहक्क अनुभव देण्याप्रती कटिबद्ध आहोत. भिवंडीमधील आमचे नवीन वेअरहाऊस पश्चिम व मध्य भारतातील सर्विस कार्यक्षमता वाढवण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. रॉयल एनफिल्ड समुदायासाठी पश्चिम घाट आणि मध्य भारत लोकप्रिय राइडिंग गंतव्य आहेत, जेथे स्पेअर पार्ट्स, ऑईल व ल्यूब्सच्या त्वरित उपलब्धतेमुळे राइडर्सना अधिक आत्मविश्वास आणि उत्साहासह विनाव्यत्यय प्रवासाचा आनंद घेता येईल.''

# श्री जोपादेवी ट्रान्सपोर्टने लॉजिस्टिक्समध्ये विकास आणि कार्यक्षमतेला गती देण्यासाठी टाटा मोटर्ससोबत केली हातमिळवणी

**नागपूर, २८ फेब्रुवारी :** १६ वर्षांहून अधिक काळापासून श्री जोपादेवी ट्रान्सपोर्ट महाराष्ट्रातील लॉजिस्टिक्स क्षेत्रातील विश्वसनीय कंपनी आहे, तसेच प्रांतातील उद्योगांना विश्वसनीय व कार्यक्षम सेवांसह पाठबळ देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. त्यांच्या यशामागील मुलभूत बाब म्हणजे भारतातील आघाडीची व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनी टाटा मोटर्ससोबतचा प्रबळ सहयोग, जी प्रगत व विश्वसनीय सोल्यूशन्ससाठी ओळखली जाते. हा सहयोग श्री जोपादेवी ट्रान्सपोर्टला नवीन महत्त्वपूर्ण टप्पे गाठण्यास आणि त्यांच्या कार्यसंचालनांमध्ये वाढ करण्यास मदत करण्यामध्ये महत्त्वाचा राहिला आहे.

श्री जोपादेवी ट्रान्सपोर्टचे व्यवस्थापकीय संचालक श्री. गणेश कांताराम बोत्रे म्हणाले, आम्हाला टाटा मोटर्ससोबतच्या आमच्या सहयोगाच्या सातत्यपूर्ण यशाचा अत्यंत अभिमान वाटत आहे. प्रबळ सेल्स नेटवर्कचे पाठबळ असलेले त्यांचे विश्वसनीय सोल्यूशन्स आम्हाला विश्वसनीय, किफायतशीर व स्केलेबल लॉजिस्टिक्स सोल्यूशन्स वितरित करण्यासाठी सक्षम करण्यामध्ये साह्यभूत राहिले आहेत. वरचढ ठरणारी बाब म्हणजे आमच्या ड्रायव्हर्सचे अभिप्राय, जे कोणत्याही अस्वस्थतेशिवाय लांब अंतरापर्यंत प्रवास करण्याबाबत सांगतात. ते सतत टाटा मोटर्सच्या वेईकल्सचा आरामदायीपणा व कार्यक्षमतेचे कौतुक करतात, ज्यामुळे प्रत्येक प्रवास आरामदायी व विनासायास होतो.''

श्री जोपादेवी ट्रान्सपोर्ट विकास व विस्तारीकरणाच्या दिशेने वाटचाल करत असताना आपल्या कार्यरत क्षमता वाढवण्याप्रती, नाविन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब करण्याप्रती आणि लॉजिस्टिक्स उद्योगामधील नेतृत्व अधिक दृढ करण्याप्रती समर्पित आहे.

# मराठी उद्योजकांनी निर्यात क्षेत्रातील संधींचा फायदा वेळीच घ्यावा : डॉ.धनंजय दातार



**मुंबई, २८ फेब्रुवारी :** भारताची निर्यात गेल्या दशकभरात विक्रमी वाढून तिहासिक उच्चांकी पातळीला पोचली आहे आणि पुढील दशकातही हा वेग टिकून राहण्याची चिन्हे आहेत. भारतात व विशेषतः महाराष्ट्रात निर्यातीस अनुकूल अशा महत्त्वाच्या घडामोडी घडत असून त्या संधींचा फायदा मराठी व्यावसायिक व उद्योजकांनी वेळीच घ्यावा, असे आवाहन दुबईस्थित अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी नुकतेच येथे केले.

मिती ग्रुपतर्फे आयोजित महाराष्ट्र बिझनेस एन्क्लेव्ह २०२५ परिषदेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या यशस्वी उपक्रमाचे हे तिसरे वर्ष आहे. माटुंग्यातील वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये झालेल्या या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील उद्योग-व्यवसाय क्षेत्रातील नामवंत तसेच नवउद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय अर्थव्यवस्था पुढील दोन-तीन वर्षांत ५ लाख कोटी रुपये उलाढालीची करण्याचे उद्दिष्ट असून त्यात निर्यातीचा महत्त्वाचा वाटा असेल, असे सांगून डॉ. दातार म्हणाले, सरकारने निर्यातदारांना प्रोत्साहन देण्यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी योजना सुरू केल्या आहेत. नवे परकी व्यापार धोरण अस्तित्वात आले आहे. उद्योग-व्यवसाय-व्यापार यासाठी गरजेच्या पायाभूत सुविधांचा दहा वर्षांपूर्वी हाती घेतलेला विकास पूर्णत्वाच्या टप्प्यावर आहे. त्यामुळे वस्तू व सेवांची देशांतर्गत उलाढाल, तसेच परदेशांना निर्यात आगामी काळात अनेकपटींनी वाढणार आहे. इंडिया-मिडल इस्ट-युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉरसारखा (आयएमइइसी) प्रकल्प दशकभरात साकारला तर भारतातून युरोपला होणाऱ्या निर्यातीचा कालावधी निम्मा होईल आणि खर्चही वाचेल. देशातील डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर (डीएफसी) प्रकल्प पूर्णत्वाच्या टप्प्यात आहे तर महाराष्ट्रात समृद्धी महामार्ग प्रकल्पही पूर्णत्वाच्या टप्प्यात आहे. नवी मुंबई येथे नवा आंतरराष्ट्रीय विमानतळ साकारत आहे. नुकताच जाहीर झालेला वाढवण बंदर व आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प महाराष्ट्राला जागतिक निर्यातीत अग्रेसर बनवणार आहे. हा सर्व विकास येत्या पाच-दहा वर्षांत फलदायी होणार असल्याने मराठी उद्योजकांनी निर्यातीच्या संधी साधायला हव्यात.

# भारतात पेन्शन एयूएम २०३० पर्यंत ११८ ट्रिलियन रुपयांपर्यंत वाढणार

**मुंबई, २८ फेब्रुवारी :** भारतात पेन्शन अंतर्गत व्यवस्थापित केल्या जाणाऱ्या निधीरुपी मालमत्तेमध्ये (एयूएम) लक्षणीय वाढ होण्याचा अंदाज डीएसपी पेन्शन फंड मॅनेजर्सने आपल्या अहवालात वर्तवला आहे. येत्या २०३० पर्यंत एकूण एयूएम ११८ ट्रिलियन रुपयांपर्यंतपोहचण्याचा अंदाज असून त्यात राष्ट्रीय पेन्शन सिस्टम (एनपीएस) चा वाटा एकूण रकमेत अंदाजे २५ टक्के राहील, अशी अपेक्षा आहे. भारताची वाढती लोकसंख्या आणि त्यामुळे दिसणाऱ्या परिणामांच्या आधारावर ही वाढ गृहीत धरण्यात आलेली आहे.

२०५० पर्यंत भारतातील वृद्धांची संख्या २.५ पटीने वाढण्याचा अंदाज आहे. तसेच निवृत्तीनंतरच्या आयुर्मानातही वाढ होऊन ती सरासरी २० वर्षांची असेल. सध्या भारतातील पेन्शन बाजारपेठेचा फारसा विस्तारच झालेला नाही. या बाजारपेठेचा सध्याचा आकार देशाच्या जीडीपीच्या अवघा ३ टक्के आहे. निवृत्तीसाठीच्या बचतीतील तफावत दरवर्षी १० टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे आणि ती २०५० पर्यंत अंदाजे ९६ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. गेल्या दशकात भारतीयांचे रोख आणि बँक ठेवींवरील अवलंबित्व ६२ टक्क्यांवरून ४४ टक्क्यांपर्यंत कमी झाल्याने भारतातील रिटेल गुंतवणूकदार पारंपारिक बचत पद्धतींपासून बाजाराशी संबंधित गुंतवणुक साधनांकडे अधिकाधिक वाटचाल करताना दिसत आहेत.

डीएसपी पेन्शन फंड मॅनेजर्सचे सीईओ राहुल भगत या अहवालप्रसंगी म्हणाले, भारतातील पेन्शनची बाजारपेठ वेगाने विकसित होण्याच्या उंबरठ्यावर असल्याचा आम्हाला ठाम विश्वास आहे. योग्य धोरणे आणि वाढत्या जागरूकतेमुळे या बाजारपेठेत नागरिकांसाठी लक्षणीय मूल्ये उघडण्याची क्षमता आहे. आमची गुंतवणूकीची मजबूत प्रक्रिया आम्हाला या क्षेत्रात एक महत्त्वाची कंपनी बनण्यास मदत करेल, असा आम्हाला ठाम विश्वास आहे. येत्या ५ वर्षांत या उद्योगक्षेत्रात टॉप ५ कंपन्यांमध्ये सामील होण्याची आम्ही अपेक्षा करतो. आम्ही व्यक्त केलेले अंदाज दीर्घकालीन सेवानिवृत्ती नियोजनाचे महत्त्व आणि आर्थिक भविष्य सुरक्षित करण्यात एनपीएसची भूमिका अधोरेखित करतात.

# राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने मुंबईत उतरले सनफीस्ट डार्क फँटसीचे 'बिग फँटसीज स्पेसशिप'

**मुंबई, २८ फेब्रुवारी :** बेंगळुरू, चेन्नई आणि हैदराबादसह दक्षिण भारतातील प्रमुख शहरांमध्ये यशस्वी प्रवास केल्यानंतर, सनफीस्ट डार्क फँटसी चे प्रसिद्ध फँटसी स्पेसशिप आता २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने मुंबईत आले आहे. ब्रँडच्या नाविन्यपूर्ण कॅम्पेनच्या बिग फँटसीज: आपल्या कल्पनांना पंख द्या अंतर्गत, हे स्पेसशिप कला आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मुलांच्या सर्जनशीलतेला आणि कल्पनाशक्तीला नवे आयाम देण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आले आहे.

या उपक्रमावर भाष्य करताना, आयटीसी लिमिटेडच्या फूड्स डिव्हिजन, बिस्किट्स आणि केक्स क्लस्टरचे सीओओ अली हारिस शेर म्हणाले, राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने या उपक्रमासाठी नेहरू साइंस सेंटर सोबत भागीदारी करणे हे तरुण मनांच्या असीम क्षमतेचा उत्सव साजरा करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. प्रत्येक क्षण त्यांच्या अद्भुत सर्जनशीलतेची जाणीव करून देतो. आम्ही आगामी काळात आणखी अनेक तरुण स्वप्नवेड्यांचे स्वागत करण्यास उत्सुक आहोत आणि त्यांच्या कल्पनाशक्ती आम्हाला पुढे कुठे घेऊन जाईल, हे पाहण्याची आतुरता आहे!

या अनोख्या अनुभवाने उत्साहित झालेल्या राहुल, या लहान सहभागीने आनंद व्यक्त करत सांगितले, मला सुपरहिरो खूप आवडतात, आणि आज माझे चित्र मोठ्या स्क्रीनवर खऱ्या डिजिटल सुपरहिरोमध्ये रुपांतरित होताना पाहिले! जणू माझी कल्पना साकार झाली. त्याच्या आई अंजली यांनीही आनंद व्यक्त करत सांगितले, एक पालक म्हणून, मी नेहमीच अशा उपक्रमांचा शोध घेत असते, जे माझ्या मुलाच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देतील. हा अनुभव खरंच जादूई होता, विज्ञान आणि कल्पनाशक्तीचा इतका सुंदर संगम मी याआधी कधी पाहिला नव्हता. त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहणे हे माझ्यासाठी अमूल्य होते!

# नगर पंचायत कार्यालय, देवरी

दिनांक- २५/०२/२०२५

मुख्याधिकारी नगरपंचायत देवरी जि. गोंदिया यांच्या वतीने नगरोत्थान महाअभियान अंतर्गत खालील कामाची बि-१ दोन लिफाफा पध्दतीने पंजीबध्द कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. कोरे निविदा प्रपत्र सोबतच कामाच्या अटी व शर्ती कार्यालयात दिनांक २७/०२/२०२५ ते ०७/०३/२०२५ पर्यंत मिळतील. निविदा दिनांक १०/०३/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल व निविदा शक्यतोवर त्याच दिवशी सांयकाळी ५.०० वाजता उघडण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | अनामत रक्कम | निविदा फार्म फी |
|---|---|---|---|
| १ | नगरोत्थान महाअभियान अंतर्गत मंजुर देवरी वाढीव पाणी पुरवठा योजनेचे Working Survey करणे. | ३०००/- | ५००/- |

अटी व शती:-

१) वरील सर्व कामाच्या सविस्तर अटी व शर्ती निविदा फार्म सोबत कार्यालयात मिळेल.


२) निविदेतील अनामत रक्कम व निविदा फार्म शुल्क नगर पंचायत कार्यालयात रोख स्वरुपात भरणा करण्यात यावी तदनंतरच निविदा फार्म पुरविण्यात येईल.

३) कोणतेही कारण न दाखवता निविदा स्विकारणे किंवा रद्द करण्याचे अधिकार मा. मुख्याधिकारी यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

४) निविदेत पंजीबध्द झाल्यानंतरच निविदा नमुना देण्यात येईल.

श्री. संजु शे. उईके, अध्यक्ष, नगर पंचायत, देवरी
कु. करिश्मा वैद्य, मुख्याधिकारी, नगर पंचायत, देवरी

# वन्यजीवांच्या जपणुकीविषयी मुलांशी संवाद साधणारी नवी चित्रपुस्तके




**बंगळुरू, २८ फेब्रुवारी :** तीन मार्च रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक वन्यजीव दिनानिमित्त, प्रथम बुक्स आणि वन्यजीव संरक्षण ट्रस्ट (डब्ल्यू.सी.टी.) यांच्या संयुक्त विद्यमाने दोन नवीन चित्रपुस्तकांचे प्रकाशन करण्यात येत आहे . खवले मांजराला कसं वाचवलं?आणि बंब; एक जादुई नळकांडी ही दोन नवी पुस्तके प्रत्यक्ष अनुभवांवर आधारलेली असून लहान मुलांमध्ये निसर्गाबद्दल आपुलकी, प्रेम आणि जबाबदारीची भावना विकसित करण्यासाठी ती उपयुक्त ठरतील. इंग्रजी, मराठी, हिन्दी, कन्नड आणि तमिळ आशा पांच भाषांमध्ये ती उपलब्ध आहेत.

खवले मांजराला कसं वाचवलं?

लेखिका राधा रंगराजन आणि पुरस्कारविजेत चित्रकार राजीव आईप यांनी खवले मांजराला ( पँगोलिनला) कसं वाचवलं? हे पुस्तक तयार केले आहे. मध्य भारताच्या घनदाट जंगलात ही गोष्ट घडते. वन अधिकारी, निसर्ग संरक्षणतज्ज्ञ आणि विशेष प्रशिक्षित कुत्री हे सर्व मिळून एका खवले मांजराला म्हणजे पँगोलिनला कसे वाचवतात आणि परत सुरक्षितपणे जंगलात सोडतात ते या गोष्टीत दाखवले आहे.

धोक्यात असलेल्या आणि नामशेष होणाऱ्या प्रजाती, त्यांच्यावर येणारी संकटे आणि त्यांना वाचवण्यासाठी डब्ल्यू. सी.टी ने केलेले प्रयत्न याविषयी ही गोष्ट प्रभावीपणे बाल वाचकांशी संवाद साधते.

बंब; एक जादुई नळकांडी

लेखिका मीनू थॉमस आणि चित्रकार रोहित केळकर यांनी हे पुस्तक तयार केले आहे. आपला शेजारी विलास, आता जळण गोळा करण्यासाठी जंगलात जात नाही याचं अमिता आणि निनाद यांना खूप आश्चर्य वाटते. शिवाय त्याची पत्नी वर्षा पाणी गरम करण्यासाठी तासन् तास चुलीसमोर घालवत नाही हे ही त्यांच्या लक्षात येतं. मुलं याचा शोध घेतात आणि मग त्यांना या बदलामागचं रहस्य उलगडतं. जादुई नळकांडी ! म्हणजे एक साधा आणि शाश्वत पद्धतीवर आधारित पण्याच हिटर आहे. तो वापरला तर जाळणाच्या वापरात घट होते आणि त्यामुळे जंगल व वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास जपले जातात.

अगदी साध्या पण कल्पक संशोधनातून पर्यावरणावर कसा चांगला परिणाम होऊ शकतो हे या गोष्टीतून दिसते.

## आज का अंदाज

शनिवार १ मार्च २०२५

### खुल जा सीम सीम

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ८ | ९ | १ | ४ | ५ | ७ |
| १२० | २४० | १७० | २३४ | १०० | १३० | १४० | १२४ |
| ४९० | ३३० | ३५० | ३६० | १३७ | २५७ | ११३ | २२३ |
| ५८० | १२३ | ८०० | ४५० | २२७ | ४०० | २३० | ३४० |
| ३१ | ६२ | ८२ | ९२ | १३ | ४२ | ५२ | ७४ |
| ३४ | ६३ | ८६ | ९४ | १५ | ४३ | ५४ | ७५ |
| ३६ | ६४ | ८९ | ९७ | १७ | ४६ | ५७ | ७६ |

१ मार्च : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | ४२ | ६३ | ९१ |
| १३ | ४४ | ६५ | ९४ |
| १७ | ४७ | ६८ | ९७ |

## राशीभविष्य

**मेष :** प्रेमसंबंधात गोडवा राहील. पण वैवाहिक जीवनात, कौटुंबिक प्रश्नांवर पती-पत्नीमध्ये मतभेद होऊ शकतात. वैवाहिक जीवनाकडे अधिक लक्ष द्या. महत्त्वाचे काम पूर्ण होईपर्यंत कोणासमोरही बोलू नका.

**वृषभ :** आज तब्येत बिघडेल. जोरात गाडी चालवू नका. अन्यथा तुम्हाला दुखापत होऊ शकते. पोटाशी संबंधित आजारांमुळे थोडा त्रास होईल. आरोग्यासंबंधी किरकोळ समस्या निर्माण होतील.

**मिथुन :** मित्र आणि भागीदारांसाठी प्रेरणादायी राहील. आज व्यवसायाची स्थिती चांगली असल्याने अपेक्षित आर्थिक लाभ होईल. पैशाच्या व्यवहारात सावधगिरी बाळगा. आर्थिक फायदा होण्याची शक्यता आहे.

**कर्क :** तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या. कामाच्या ठिकाणी काम करणाजया लोकांनी अधिक मेहनत केल्यास परिस्थिती सुधारेल. खाजगी व्यवसाय करणाजयांना अचानक लाभ होण्याची शक्यता आहे.

**सिंह :** राजकारणात तुमची सक्रियता वाढेल. तुम्हाला एखाद्या महत्त्वाच्या मोहिमेची कमान मिळू शकते. नोकरदार वगार्ला रोजगार मिळेल. बिझनेस ट्रिपला जाण्याची शक्यता आहे.

**कन्या :** महत्त्वाच्या कामात आज विचारपूर्वक निर्णय घ्या. विरोधकांना तुमच्या प्रगतीचा हेवा वाटेल. सामाजिक आदर आणि प्रतिष्ठेच्या क्षेत्रात उच्च पदावरील लोकांशी संपर्क साधला जाईल.

**तुळ :** पैशाचा आणि मालमत्तेचा वाद पोलिसांच्या माध्यमातून सोडवला जाऊ शकतो. आज प्रेमसंबंधांमध्ये अधिक महत्त्वाकांक्षा वाढू शकते. आपल्या भावना सकारात्मक करण्याचा प्रयत्न करा.

**वृश्चिक :** शरीर थकवा, ताप, सर्दी इत्यादी तक्रारी असू शकतात. आज तुमच्या मनात अधिक नकारात्मक विचार येतील. काही अनुचित घटना घडण्याची शक्यता आहे. ऐषआरामात अधिक रस राहील.


**धनु :** तुमच्या क्षमता आणि कौशल्याने तुमचे स्थान टिकवण्यात तुम्ही यशस्वी व्हाल. विविध प्रकारचे अडथळे आपोआप दूर होतील. अनुभव आणि पद प्रतिष्ठा यांचा लाभ मिळेल.

**मकर :** कामाच्या ठिकाणी अनावश्यक वाद होऊ शकतात. दुसजयाच्या भांडणात पडणे टाळा. अन्यथा प्रकरण पोलिसांपर्यंत पोहोचू शकते. परदेशाशी संबंधित आयात-निर्यात कार्यात लोकांना लक्षणीय यश मिळेल.

**कुंभ :** कपडे आणि दागिने मिळतील. अडकलेला पैसा मिळेल. व्यवसायाची स्थिती सुधारेल. त्यामुळे उत्पन्न वाढेल. प्रिय व्यक्तीचे सहकार्य मिळेल. खरेदी-विक्रीतून फायदा होईल.

**मीन :** ताकदवान प्रयत्न कायम ठेवतील. प्रणालीचे नियम अधिक चांगल्या पद्धतीने पुढे नेतील. वरिष्ठांच्या आदेशाचे पालन कराल. मोठे निर्णय घेऊन आवश्यक ती पावले उचलण्याचे प्रयत्न होतील.

## शब्दकोडे क्रमांक २०४७



**आडवे शब्द :-**
१) कामाचा झपाटा
३) श्रीरामाचे स्तोत्र
६) जखमेवर लावण्याचे स्निग्ध औषध
९) पवात
११) मुस्लीमांची प्रार्थना पद्धत
१३) प्रामास्नणक, गरीब, साधा
१५) पादत्राण
१६) वाघ-ससहाची आरोळी
१८) पृथ्वीखालची कस्नपपत जागा
१९) चंद्राची कड
२०) एक सुगंधी वनस्पती
२१) गर्ववष्ठ
२२) जास्तीतजास्त व कमीतकमी
२५) मानवी कत्तल
२७) भेग, चीर
२९) धमनी
३०) कूमा कच्छप
३१) एकाग्र सचतन, मन,
३२) रस्ता
३३) कलावंत
३५) अधम
३७) संतापी
४०) पोळीचा एक चतुथांश भाग
४२) पस्नवत्र
४३) राजवाडा
४६) रक्षण करणारा
४८) मनाला टोचणारे दुःख
४९) काळपुरुष
५०) वक्र
५१) ऋणको
५४) नौकेतून प्रवास
५५) पक्षी
५६) पुष्परस
५८) पोट
५९) जैन साधु
६१) स्नबनावासाचे पांढरे फूल
६२) भारवाहक
६४) एक आकदवासी जमात यांची स्नचत्रशैली जगप्रस्नसद्ध आहे
६५) पटल
६७) दक्षतेचा इशारा
७०) लवकर, त्वरेने
७२) स्ननरुपाय झालेला
७३) वेणी, हारामध्ये वापरली जाणारी सुगंधी वनस्पती
७४) बातमी
७५) पदाथाचा सूक्ष्म भाग

**उभे शब्द :-**
१) स्ननरुद्योगी, भटक्या, मोकळा सुटलेला
२) सोन्याचा पवात
३) गवंडी
४) धरणी
५) धुणे
७) श्रीरामाचा एक पुत्र
८) मोठा समुद्र
१०) एक शेंगभाजी
१२) वनमाळी
१४) दरोडेखोरांचा नेता
१७) कवने रचणारा
१९) औषधी गर असलेली एक काटेरी वनस्पती
२०) एक श्वासरोग
२१) थोरवी, मोठेपणा
२२) अत्यंत धनाढ्य मनुष्य
२३) नमूना
२४) स्वगातील गायक
२५) लोणी
२६) लोणी
२८) पवाताचा उंच तुटलेला कडा
३२) मोठी उथळ वाटी
३४) नेहमी, नोकरीत पक्का
३६) चांदणे हेच ज्याचे जीवन आहे असा पक्षी
३८) कफकीर
३९) एक मोठे चमावाद्य
४०) पटकन
४१) रक्षण करणारे सशस्त्र सैस्ननक
४२) सभतीवरून सरपटणारा प्राणी
४४) बस्तान
४५) आक्रोश, स्नवलाप
४७) ऋण
४८) भागीदार
५०) कावळा
५२) ककमत
५३) जेवण
५५) नास्नवकदल
५७) वणा
५८) उमाचा पती-शंकर
५९) नष्ट होणारे
६०) बशीचा जोडीदार
६३) आवाज, ध्वनी
६४) काळ्या तोंडाचे मोठे माकड
६६) बाराचा संच(इं )
६७) टरफल
६८) स्ननवासस्थान
६९) पंख
७१) मासा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# येवदा-वनोजा-सातेगाव रस्त्याची दुरुस्ती होणार

## सा.बां. विभागाच्या आश्वासनानंतर उपोषण मागे

## खा. बळवंत वानखडेंनी केली मध्यस्थी



**महासागर प्रतिनिधी**

अंजनगाव सुर्जी, (दि. 28)– तालुक्यातील येवदा – वनोजा बाग – सातेगाव फाटा या महत्वपूर्ण रस्त्याची प्रचंड दुर्दशा झाली आहे. रस्त्याच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी या गावातील रहिवाशांनी 25 फेब्रुवारीपासून वनोजा बागच्या येथे श्री क्षेत्र लखमाजी महाराज संस्थान येथे आमरण उपोषण सुरु केले होते. या आंदोलनाची दखल घेउन खासदार बळवंत वानखडे यांनी मध्यस्थी केली. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता नरेश अघम यांनी तात्काळ रस्त्याची दुरुस्ती करण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यामुळे ग्रामस्थांनी आपले उपोषण मागे घेतले आहे.

वारंवार रस्त्याच्या दुरुस्तीसाठी मागणी करुनही सार्वजनिक बांधकाम विभागाने त्याकडे दुर्लक्ष करण्याचे धोरण अवलंबिले होते. अखेर संतप्त गावक?यांनी आंदोलनाचा निर्णय घेतला आणि आमरण उपोषणाला सुरुवात केली होती. पंचायत समितीचे माजी उपसभापती रवींद्र वानखडे यांच्यासह महेश खारोडे, वनोजा बाग येथील सरपंचा शालिनी गायगोले, ग्रामपंचायत सदस्य महादेव पातोंड, हिंगणी येथील उपसरपंच दिनेश अगडते, सामाजिक कार्यकर्ते देवानंद थोरात उपोषणाला बसले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका?यांनी उपोषण सोडवण्याची विनंती केली होती. परंतू मागण्या पूर्ण होईस्तोवर उपोषण मागे घेणार नाही, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली होती.

अखेर खासदार बळवंत वानखडे यांनी मध्यस्थी केली. सार्वजनिक विभागाचे उप विभागीय अभियंता नरेश अघंम यांच्याकडून सध्या चालू असलेले रस्तेचे खड्डा भरण्याचे काम चालू ठेवून 2025 –26 अर्थसंकल्पात या रस्त्याकरिता निधी मागण्यात येईल किंवा केंद्रीय अंतर्गत रस्ता मंजूर करण्यात येईल असे लेखी आश्वासन घेण्यात आले. तेव्हा हे आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता अक्षय गोहाड, कनिष्ठ अभियंता आदिनाथ सानप, सुधाकर पाटील भारसाकडे, राजेंद्र गायगोले, छोटू मानकर, रमेश सावळे, चंदन गायगोले, बंडू पातोंड, श्रीकांत गायगोले, अनिल गायगोले, सुरेश काकड, रवी नाथे, मनोज मेळे, सिद्धार्थ सावळे, प्रदीप ओंकार तसेच बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# दरवाढीच्या अपेक्षेने कापुस घरातच पडुन

## शेतकरी झाला कर्जबाजारी



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, (दि. 28)** – यंदाच्या पावसाळ्यातील अतिवृष्टी आणि पुरामुळे कापूस पिकाचे मोठे नुकसान झाले. उत्पादनात घट झाल्याने शेतकरी कापसाच्या दरवाढीची अपेक्षा करत होते; मात्र फेब्रुवारी महिना संपला, तरीही कापसाचे भाव स्थिरच आहेत. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना कमी दरात कापूस विकावा लागत आहे, तर काही शेतकरी दरवाढीच्या आशेने कापूस घरातच साठवून ठेवत आहेत.

राज्यातील चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, अकोला, अमरावती आणि नागपूर हे जिल्हे कापूस उत्पादनात अग्रस्थानी आहेत. अमरावती जिल्ह्यातील दर्यापुर, अंजनगाव आणि भातकुली, चांदुर बाजार तालुक्यांमध्ये कापसाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. मात्र, यंदा पावसामुळे शेकडो हेक्टरवरील कापूस पिकाचे नुकसान झाले आहे. उत्पादन कमी झाल्याने शेतकरी दरवाढीची अपेक्षा करत होते; परंतु सध्या कापसाला सात हजार 300 ते सात हजार 400 रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे, ज्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त आहेत.

शासनाचे धोरण आणि वातावरणातील बदल यामुळे शेतकऱ्यांची स्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे. उत्पादन खर्च वाढत असताना, कापसाचे दर मात्र समाधानकारक नाहीत. यंदा उत्पादन कमी असूनही दरवाढ न झाल्याने शेतकरी कर्जबाजारी होत आहेत. कपाशी हे शेतकऱ्यांचे नगदी पीक आहे.

कपाशी पिकावर होणारा खर्च अधिक असल्याने कमी दरात कापूस विकणे शेतकऱ्यांना परवडत नाही. सध्या कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि जिनिंग केंद्रांमध्ये कापसाला 7,300 ते 7,400 रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे. कापसाला किमान 11 ते 12 हजार रुपये प्रति क्विंटल दर मिळावा, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. कमी दरांमुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहेत.

वातावरणातील बदल आणि शासनाचे शेतकऱ्यांसाठी धोरण शेतीसाठी दरवर्षी घातक ठरत आहे. त्यामुळे उत्पादन खर्च जास्त आणि उत्पादन कमी, अशी शेतकऱ्यांची बिकट अवस्था नेहमीच होत आली आहे. त्यामुळे शेतकरी दिवसेंदिवस कर्जबाजारी होत आहे. यंदा कापसाचे उत्पादन कमी आहे. त्या तुलनेत दरवाढ होणे गरजेचे होते. पण झाली नाही. असे शेतकरी सांगतात.

कपाशी शेतकऱ्यांचे नगदी पीक आहे. कपाशी पिकावर केला जाणारा खर्च अधिक असल्याने कमी दरात कापूस विकणे शेतकऱ्यांना परवडत नाही. त्यामुळे कापूस दरवाढ व्हावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे. कापसाला बाजार समिती व जिनिंग येथे विकायला नेला असता 7,200 ते 7,300 पर्यंत दर मिळत आहे. कापसाला साधारणपणे 11 ते 12 हजार रुपये दर पाहिजे. कमी दर मिळत असल्याने शेतकरी कर्जबाजारी झाला आहे.

कापूस शेतकऱ्यांचे नगदी पीक असले तरी इतर पिकांपेक्षा कापूस पिकावर खर्च जास्त होत आहे. त्यामुळे कमी दराने कापसाची विक्री करणे शेतकऱ्यांना परवडत नाही.

# किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक मार्गदर्शन

## विशाखा समितीचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.28 )** – श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित शिवाजी उच्च माध्यमिक शाळा मोर्शी येथे विशाखा समिती अंतर्गत मुलींकरिता आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यासाठी एका शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

या मार्गदर्शन शिबिरात डॉ. ऋजुा श्रीराव शिरभाते यांनी मुलींना आरोग्य विषयक माहिती दिली. तसेच समाजातील मानसिक विकृतीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, आपल्यावर कोणत्याही प्रकारचा अत्याचार होणार नाही, याकरिता दक्ष राहण्यासंदर्भात सल्ला दिला. आजची मुलगी उद्याची माता आहे. म्हणून तिने स्वत:ची काळजी घेणे गरजेचे आहे, असे डॉ ऋजुा श्रीराव यावेळी बोलताना म्हणाल्या. याप्रसंगी शाळेचे



मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख, पर्यवेक्षक मिलिंद ढाकुलकर, उद्धव गीद, शिक्षक प्रतिनिधी अशोक चौधरी, विशाखा समितीच्या सचिव कु. शितल टोळे, शिक्षिका वर्षा निंघोट, विशाखा ठाकरे, प्रेमा नवरे, विजया रोकडे, जया धकीते, वर्षा साठवणे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शितल टोळे तर संचलन वर्षा निंघोट यांनी केले. आभार प्रदर्शन प्रेमा नवरे यांनी केले.

# प्रख्यात संशोधक डॉ. बिवूदत्त मिश्रा यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

## विद्यानिकेतन शाळेत कार्यशाळा



**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि.28 )**– राजस्थानच्या कोटा येथील बिट्स पिलानी ग्रुपचे हैद्राबाद कॅम्पसचे देशभरात प्रख्यात असलेले संशोधक डॉ. बिवूदत्त मिश्रा यांनी एका कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित या विषयावर मार्गदर्शन करुन संवाद साधला. धामणगाव एज्युकेशन सोसायटीच्या विद्यानिकेतन सीबीएसई स्कूलमध्ये या विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. बिवूदत्त मिश्रा यांनी गुरुत्वाकर्षणाच्या संशोधनात्मक गोष्टींचा उलघडा करत त्यांनी वीस देशांमध्ये विविध पेपरच्या प्रकाशनचा अनुभव सांगितला. विज्ञानाच्या दृष्टीने आपले अचूक अनुमान हे जीवनाच्या उत्तम कार्याची वाटचाल असल्याचे डॉ. मिश्रा यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले. डॉ. विलास राऊत यांनी गणित विषयावर मार्गदर्शन केले. तर विद्यार्थ्यांशी विविध प्रश्नांवर चर्चा व संवाद साधला. यावेळी मंचावर संस्थेचे अध्यक्ष ॲरड. रमेशचंद्र चांडक, डॉ. विलास राऊत, डॉ. के. एस. अढाव, शाळेचे संचालक राजेंद्र जोशी, प्राचार्य रवी देशमुख, उपप्राचार्य साई नीरजा उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सागर ठाकरे यांनी केले. यावेळी शेकडो विद्यार्थ्यांसह शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# अपंगांना मिळावा अंत्योदय योजनेचा लाभ

## अपंग जनता दलाची मागणी | जिल्हाधिकार्यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )** – अपंगांना अंत्योदय अन्न योजनेचा लाभ मिळावा अशी मागणी अपंग जनता दल आणि महाराष्ट्र राज्य सामाजिक संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेच्या पदाधिकार्यां नी जिल्हाधिकार्यांना एक निवेदनही सादर केले आहे.

नूकतीच अपंग जनता दल आणि सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य यांनी जिल्हाधिकार्यांधची भेट घेतली व त्यांना निवेदन सादर केले. शासनाने अपंगांना अंत्योदय अन्न योजनेचा लाभ देण्यासाठी शासन निर्णय जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील अनेक अपंग व्यक्तींनी आपापल्या तहसील कार्यालयात अर्ज सादर केले आहेत. मात्र, तहसील प्रशासनाकडून अनेक वर्षांपासून इष्टांक नसल्याचे कारण देत अपंगांना या योजनेपासून वंचित ठेवले जात आहे. तर इतर



पात्र लाभार्थ्यांना या योजनेत समाविष्ट करण्यात येत आहे. असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील सर्व अपंगांना त्वरित अंत्योदय अन्न योजनेत समाविष्ट करून त्यांना लाभ द्यावा. अन्यथा अपंग जनता दल व सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य, अमरावती यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशाराही या निवेदनातन देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी अपंग जनता दलाचे जिल्हाध्यक्ष मयुर मेश्राम, राहुल वानखडे, शेख रुस्तम, राजिक शाह, प्रमोद शेबे, धनश्री पटोकार, कांचन कुकडे, शेख निसार, ज्योती देवकर आदी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांने काढला चाकू

**अमरावती** – मार्डी मार्गावरील एका महाविद्यालयाच्या वैद्यकीय शाखेच्या विद्यार्थ्यांमध्ये 27 फेब्रुवारी रोजी क्रिकेट खेळताना वाद झाला. या वादात एकाने दुसऱ्यावर चाकू रोखला. सदर प्रकरण 28 फेब्रुवारी रोजी फ्रेजरपुरा ठाण्यापर्यंत पोहोचले. यावेळी सदर विद्यार्थ्याला तंबी देण्यात आली.

# सिद्धेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्री महोत्सव उत्साहात


## आठ दिवस धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.28 )**– मोर्शी शहरातील असरानी लेआउट मध्ये असलेल्या श्री. सिद्धेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्री महोत्सव आठ दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

महाशिवरात्री उत्सवानिमित्त सिद्धेश्वर महादेव मंदिराची रंगरंगोटी करून रोषणाईने संपूर्ण मंदिर उजळविण्यात आले होते. मंदिराला आकर्षक सजावट करण्यात आली होती. या मंदिरात शिवपार्वती सोबतच श्री. गणेश आणि विठ्ठल–रुक्माईच्या मुर्त्यांची स्थापना करण्यात आली आहे.

19 फेब्रुवारीला श्रीकांत



सिनकर यांच्या हस्ते तीर्थस्थापना करून या महोत्सवाला प्रारंभ झाला. दररोज सकाळी पुरोहितांद्वारे मंत्रोपचार करून भगवान शिवाचा अभिषेक केला जात होता. विविध मंडळांच्या भजनाचे कार्यक्रम पार पडले. सिंभोरा येथील महिला भजन मंडळ तसेच महादेवाचे गाणे सादर करणाऱ्या मंडळाने सेवा दिली. सायंकाळी दररोज सामुदायिक प्रार्थना व हरिपाठ आयोजित करण्यात आला होता. महोत्सवादरम्यान आठवडाभर भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. महाशिवरात्रीला शेकडो भाविकांनी सिद्धेश्वर शिव मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली होती. ट्रस्टच्या वतीने यावेळी प्रसादाचे वितरण करण्यात आले. 28 फेब्रुवारीला महाप्रसादाने या महोत्सवाची सांगता झाली. सिद्धेश्वर महादेव चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष विजय आमदरे आणि संपूर्ण कार्यकारी मंडळाने महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# रस्त्याच्या कामातील भ्रष्टाचाराची चौकशी थंडबस्त्यात

## जिल्हाधिकाऱ्यालच्या आदेशाची अवहेलना

## सार्वजनिक बांधकाम विभागाची उदासिनता

## देवमाळी ग्रामपंचायत मधील प्रकार







**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा, ( दि.28 )**– परतवाडा शहरालगत असलेल्या देवमाळी या उच्चभ्रू लोकांच्या वस्तीतील ग्रामपंचायतने रोजगार हमी योजनेतून केलेल्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम निकृष्ठ दर्जाचे असून त्यात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप नागरिकांनी केला होता. या कामाची चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकार्यांषनी दिले असले तरी त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने उदासिन धोरण अवलंबील्याने ही चौकशी थंडबस्त्यात पडली आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी देवमाळी ग्रामपंचायतमध्ये मोठ्या प्रमाणात रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे रोजगार हमी योजनेतून करण्यात आली आहे. या रस्त्यांकरिता शासनाकडून मजूर आणि बांधकाम साहित्यासाठी स्वतंत्र निधी देण्यात येतो. नियमानुसार मजुरांनी मंजूर रस्त्यावर प्रत्यक्ष काम करणे गरजेचे आहे. मात्र या रस्त्याची कामे निवडणुकीपूर्वी पूर्ण करण्यासाठी घाईने मिक्सर, जेसीबी या यंत्राद्वारे उरकली गेली. असा आरोप मनिष गुप्ता या रहिवाशाने केला आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकार्यांककडे तक्रार दाखल केली आहे. यंत्राद्वारे काम सुरु असतानाचे व्हिडिओही काही लोकांनी काढून ठेवले आहे. यंत्राद्वारे कामे केली असली तरी ही कामे मजुरांनी केली असे दाखवून मजुरांच्या नावे पैसे काढले असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

तक्रारीची दखल घेउन जिल्हाधिकार्यांनी अचलपूरच्या तहसीलदारांना या प्रकारणाची चौकशी करण्याचे आदेश दिले. त्यानंतर तहसीलदारांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय अभियंता, देवमाळी ग्राम पंचायत कार्यालय आणि तेथील रोजगारसेवक यांना चौकशी करण्याचे पत्र दिले आहे. तहसीलदार यांच्या पत्राच्या अनुषंगाने देवमाळी ग्रामपंचायतने आपला अहवाल तत्काळ सादर केला आहे. सदरचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंता यांच्या कार्यालयाकडून केले असून त्यांनी बांधकामाबाबतची माहिती ग्रामपंचायतला दिली नसल्याचे आणि त्यामुळे अहवाल देता येत नसल्याची माहिती पत्राद्वारे ग्रा. पं. ने तहसीलदार यांना दिली आहे. रोजगार सेवक ग्रा.पं. मध्ये उपस्थित राहत नसून त्यांनी परस्पर कामे केली असल्याचा स्पष्ट उल्लेख असल्याचे पत्रात नमूद आहे. तहसीलदारांच्या आदेशाप्रमाणे केवळ ग्रा. पं. चा अहवाल तयार झाला आहे; मात्र सा. बां. उपविभाग अचलपूर आणि रोजगार सेवक यांनी अहवाल तयार केला किंवा नाही. जिल्हाधिकार्यांयनी 17 जानेवारी 2025 रोजी या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश तहसिलदारांना दिले होते. त्याला आता एक महिन्याचा प्रदिर्घ कालावधी झाल्यानंतरही ही प्रक्रिया थंडबस्त्यात पडली असल्याने त्याला सार्वजनिक बांधकाम विभागाची उदासिनता कारणीभूत ठरत आहे. या प्रकरणाची रोजगार हमी आयुक्त नागपूर यांच्याकडे 19 फेब्रुवारी 25 रोजी ऑनलाईन तक्रार दाखल करण्यात आली आहे.


# अचलपूर-परतवाड्यातील शिवालयांमध्ये भक्तांची गर्दी

## महाशिवरात्रीचा उत्साह, हर हर महादेवचा जयघोष

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.28 )** – परतवाडा आणि अचलपूर शहरात महाशिवरात्रीचा उत्साह सर्वत्र दिसून आला. शिवभक्तांनी भक्ती भावाने हा उत्सव साजरा केला. शहरातील सर्व शिवमंदिरे शिवभक्तांच्या गर्दीने फुलून गेली होती. सर्वत्र हरहर महादेवचा जयघोष ऐकू येत होता.

शहरातील नागनाथ महादेव मंदिर, गोदेश्वर महादेव मंदिर, पाताळेश्वर मंदिर, अमिनाथ मंदिर, हाथी तलाव परिसरातील महादेव मंदिर, गोपीनाथ महादेव मंदिर, भवानी माता मंदिरातील शिवालय, किल्ला परिसरातील



शंकर मंदिर व काळेश्वर महादेव मंदिर यासह अनेक लहान–मोठ्या शिव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त भक्तांची मांदियाळी होती. या मंदिरांवर आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. मंदिरांचा गाभारा फुलांनी सजविण्यात आला होता. पहाटेपासून भगवान शंकराचा जलाभिषेक करण्यासाठी सर्वच मंदिरांमध्ये भक्तांच्या लांब रांगा लागल्या होत्या. जलाभिषेक, दुग्ध विषयक करून श्री. शंकराच्या मूर्तीवर व शिवपिंडीवर भक्त बेलपत्र, फुले अर्पण करताना दिसत होते. शहरात ठीकठिकाणी फराळाचे वितरण करण्यात आले. विविध मंदिरांमध्ये आठ दिवसांपासून महाशिवरात्री महोत्सवानिमित्त भागवत कथा, शिवपुराण कथेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा समारोप महाप्रसादाने झाला.

